७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. ०३ जून २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# शेतकरी कर्जमाफीला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता

## २ लाखांपर्यंतचे कर्ज होणार माफ; रस्ते सुधारणा प्रकल्पाला ८७०० कोटींचे अर्थसहाय्य

**मुंबई (दै. संध्या)**



शेतकरी कर्जमाफीला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता मिळाली. आता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे 2 लाखांपर्यंतचे थकित माफ होणार आहे. त्यामुळे बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे. या कर्जमाफीची घोषणा सध्या सुरू असलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीपूर्वीच जाहीर केले होते.

विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेले शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाळले आहे. फडणवीस यांनी यंदा अर्थमंत्री म्हणूनही अर्थसंकल्प मांडला. त्याचवेळी त्यांनी कर्जमाफीची घोषणा केली होती. अखेर या निर्णयाला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता मिळाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 30 सप्टेंबर 2025 पर्यंत पीककर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली होती. त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना केली. त्यानुसार पात्र शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळेल. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देणार असल्याची घोषणाही फडणवीस यांनी केली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने आज मान्यता दिलेल्या शेतकरी कर्जमाफीचा राज्यातल्या एकूण 56 लाख शेतकऱ्यांना फायदा होण्याची शक्यता. शेतकऱ्यांची तब्बल 36,585 कोटी रुपयांची कर्जमाफी होणार आहे. मात्र, यामुळे सरकारच्या तिजोरीवर तब्बल 25 हजार कोटींचा भार पडण्याची शक्यता आहे. एकीकडे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अनुदान आणि आता दुसरीकडे शेतकरी कर्जमाफी या दोन्ही योजनांमुळे सरकारला आगामी काळात आर्थिक काटकसर करावी लागण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा - ३ मधील कामांसाठी आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या रुपये ५०० दशलक्ष कर्जास तसेच राज्य निधीच्या प्रस्तावास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम) रस्त्यांच्या सुधारणेसाठी आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक आणि न्यू डेव्हलपमेंट बँकेकडून अर्थसहाय्य. महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पाला दोन्ही बँकांकडून प्रत्येकी रुपये ८७०० कोटींचे अर्थसहाय्य. राज्यातील रस्ते सुधारणा आणि विकासकामांना अधिक गती मिळणार. (सार्वजनिक बांधकाम विभाग) हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ, मुंबई या समूह विद्यापीठामध्ये ६ महाविद्यालयांचा समावेश करण्यास मान्यता. यामध्ये प्राचार्य के. एम. कुंदनानी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, मुंबई, किशनचंद चेलाराम विधी महाविद्यालय, मुंबई, श्रीमती मिठीबाई मोतीराम कुंदनानी वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई, ऋषी दयाराम आणि सेठ हसराम नॅशनल आणि सेठ वासियामुल्ल असोमुल्ल विज्ञान महाविद्यालय, मुंबई, थडोमल शाहनी अभियांत्रिक महाविद्यालय, मुंबई आणि हास्साराम रिजूमल वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई यांचा घटक महाविद्यालये म्हणून समावेश होणार. (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) शेती आणि नैसर्गिक संकटे यांचे नाते फार जुने आहे. अगदी राजे-महाराजांच्या काळातही तीन वर्षांतून एकदा तरी पीक हातचे जायचे, अशी नोंद इतिहासात आढळते. त्यावेळी संपूर्ण अर्थव्यवस्था शेतीवर आधारित असल्याने राजे संकटाच्या काळात शेतसारा (कर) माफ करायचे. काही राजांनी तर शेतीचा विकास व्हावा म्हणून कर्ज पुरवल्याचेही दाखले आहेत.

## मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत एअर इंडिया इमारत करारनाम्याचे हस्तांतरण



**मुंबई (दै. संध्या)**

मंत्रालयाजवळील एअर इंडिया इमारत राज्य शासनाने खरेदी केली आहे. एअर इंडिया ॲसेट होल्डिंग कंपनी आणि राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील करारनाम्यांचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले. बैठकीनंतर मंत्रिमंडळ सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, एअर इंडिया कंपनीचे वाणिज्य अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

## रायगडावरील सुविधांची सामूहिक पाहणी करून व्यापक आराखडा ठरविणार : आशिष शेलार



**मुंबई (दै. संध्या)**

रायगड किल्ला परिसरातील विकासकामे, जनसुविधा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा, रायगड किल्ल्याचे जतन व संवर्धन तसेच रायगड विकास प्राधिकरणाच्या कार्यप्रणालीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी संयुक्त स्थळ पाहणी करावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिले. रायगड किल्ला विकास पर्यटन आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचा मंत्री ॲड.शेलार यांनी मंत्रालयात आढावा घेतला. यावेळी रायगड किल्ला विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती (दूरदृश्य प्रणालीद्वारे), सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, महसूल विभागाचे उपसचिव संजय धारूरकर, सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, उपसचिव महेश वाव्हळ, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ.तेजस गर्गे तसेच रायगड जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, भारतीय पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत रायगड किल्ल्यावर सुरू असलेल्या जतन संवर्धन व विकासकामांची माहिती देण्यात आली. शिरकाई मंदिर, महादरवाजा आणि वाघ दरवाज्याच्या संवर्धनाची कामे सुरू असून राणी वसाहतीचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले. तसेच हत्ती तलाव व फुटका तलाव परिसरातील गाळ काढणे आणि गळती रोखण्याची कामेही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर, रायगडावरील स्वच्छतागृहे, त्यांची देखभाल आणि पाणीपुरवठा यासंदर्भातील प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# पाटणमध्ये उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाला गती

### *आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध : मंत्री प्रकाश आबिटकर*

**मुंबई (दै. संध्या)**



पाटण तालुक्यातील नागरिकांना दर्जेदार आणि आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय प्रकल्पाची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. पाटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधांच्या वाढीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई , सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई रविंद्रन आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच सातारा, पाटण येथील आरोग्य विभागाचे अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आरोग्यमंत्री आबिटकर यांनी रुग्णालयातील मनुष्यबळ, बांधकामाची सद्यस्थिती आणि भविष्यातील सुविधा यांचा सविस्तर आढावा घेतला. सध्या ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या प्रकल्पाला २७.१८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता तसेच २३.४२ कोटी रुपयांची तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तावित उपजिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक ओपीडी विभागासह शस्त्रक्रिया, अस्थिरोग, स्त्रीरोग, बालरोग, नेत्ररोग, एक्स-रे, सोनोग्राफी यांसह विविध सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच मुख्य इमारतीमध्ये लेबर रूम, ऑपरेशन थिएटर, कॅज्युअल्टी वॉर्ड, एएनसी-पीएनसी वॉर्ड, मेडिकल-सर्जिकल वॉर्ड, आयसीयू, डायलिसिस आणि बर्न वॉर्ड यांसारख्या सुविधा उभारण्यात येणार आहेत.

प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश सप्टेंबर २०२३ मध्ये देण्यात आला असून मुदतवाढीनंतर सप्टेंबर २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सध्या ओपीडी इमारतीचे आरसीसी बांधकाम पूर्ण झाले असून एकूण कामाच्या सुमारे १० टक्के काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत सुमारे १.८५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामाचा वेग वाढविण्याचे, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे आणि रुग्णसेवेत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, “पाटणसारख्या दुर्गम आणि डोंगराळ भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध व्हाव्यात, ही शासनाची प्राथमिकता आहे. १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय पूर्ण झाल्यानंतर सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

या प्रकल्पासाठी आवश्यक निधी, जमीन अधिग्रहण आणि प्रशासकीय बाबींमध्ये कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून हा प्रकल्प वेळेत पूर्ण करावा.” आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पाटण उपजिल्हा रुग्णालयाचा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




### अब्दुल सत्तारांच्या विधानानंतर रंगलेल्या चर्चांवर एकनाथ शिंदेंची भूमिका

# शिवसेना पुन्हा एकत्र येणार का?

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांदरम्यान आता शिवसेना ठाकरे गट आणि शिवसेना शिंदे गट पुन्हा एकत्र येणार का, याबाबतही राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी भाजप शिवसेनेला कमकुवत करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केल्यानंतर या चर्चांना आणखी वेग मिळाला. त्यानंतर दोन्ही शिवसेना गट पुन्हा एकत्र येण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र या सर्व चर्चांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट प्रतिक्रिया देत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

ठाणे-पालघर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार रवींद्र फाटक यांनी विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना एकनाथ शिंदे यांनी शिवसेना विलीनीकरणाच्या चर्चांना स्पष्ट शब्दांत नकार दिला. आमचीच शिवसेना ही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारी संघटना असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच जनतेने दिलेला कौल आणि पाठिंबा आपल्या पक्षाला मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी शिंदे यांनी आपल्या सरकारच्या कामगिरीचाही उल्लेख केला. बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारधारेवर आम्ही ठामपणे चालत आहोत. महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणारे सरकार आम्ही एकदा नव्हे तर दोनदा स्थापन केले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही जनता शिवसेना, धनुष्यबाण चिन्ह, बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांवर विश्वास ठेवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मात्र उद्धव ठाकरे यांच्यासोबत पुन्हा राजकीय समीकरण जुळण्याची शक्यता आहे का, या प्रश्नावर त्यांनी थेट उत्तर देणे टाळले.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या चर्चांच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटावर निशाणा साधला. खरी शिवसेना ही उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालीच असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना ही प्रत्यक्षात भाजपचे नेते अमित शहा यांनी निर्माण केलेली एक प्रकारची ‘सिस्टर कन्सर्न’ असल्याचा टोला राऊत यांनी लगावला. त्यामुळे या विषयावर दोन्ही गटांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण अधिक तीव्र झाले आहे.

या संपूर्ण वादाची सुरुवात अंबादास दानवे आणि अब्दुल सत्तार यांच्या वक्तव्यांमधून झाली. अंबादास दानवे यांनी मोठा मासा छोट्या माशाला गिळतो, असे म्हणत भाजप शिवसेनेचे अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर अब्दुल सत्तार यांनीही भाजपवर टीका करत, शिवसेना ठाकरे गटाचे हात-पाय कापण्यात आले असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तर थेट शिवसेनेचे मुंडकेच छाटले असल्याचे वक्तव्य केले होते. या विधानांमुळे दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांना मोठे बळ मिळाले होते.

# गुजरातमध्ये महाराष्ट्राच्या २ बसचा भीषण अपघात

## १० हून अधिक प्रवासी गंभीर; डिव्हायडर क्रॉस करून दुसऱ्या बसला धडक



**मुंबई (दै. संध्या)**

गुजरातच्या सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यात आज एक अत्यंत भीषण आणि हृदयद्रावक अपघात झाला. बारडोलीच्या उवा गावाजवळ महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या MH-१८ BZ - १२५८ आणि MH-२० BL-३३९० या दोन बसची समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघातात ७ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. रस्त्यावर उलटलेल्या एका टँकरला वाचवण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाला असून, एक बस सीएनजीवर चालणारी असल्याने धडकेनंतर काही वेळातच तिला आग लागली. या अपघातात १७ जण जखमी झाले असून, त्यापैकी १० हून अधिक प्रवासी गंभीर आहेत. या गंभीर जखमींना सुरत येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, बारडोली-उवा महामार्गावर एक टँकर पलटी झाला होता. या पलटी झालेल्या टँकरला धडक टाळण्यासाठी पाठीमागून येणाऱ्या महाराष्ट्र पासिंगच्या एसटी बस चालकाने गाडी वळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वेगावर नियंत्रण न राहिल्याने बस चालकाचा ताबा सुटला. बस थेट दुभाजक ओलांडून विरुद्ध बाजूच्या रस्त्यावर गेली आणि समोरून येणाऱ्या महाराष्ट्र पासिंगच्या दुसऱ्या एका भरधाव एसटी बसला या बसने जोरदार धडक दिली. ही समोरासमोरची धडक इतकी भीषण होती की, दोन्ही बसेसचे मोठे नुकसान झाले. एका बसच्या समोरचा भागाचा चेंदामेंदा झाला असून, दुसरी बस रस्त्याच्या खाली जाऊन पलटी झाली. रस्त्यावरून खाली गेलेली बस सीएनजीवर चालणारी होती. धडक बसताच सीएनजीची गळती होऊन बसला भीषण आग लागली. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केल्याने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. आगीच्या ज्वाळांमध्ये अडकलेल्या प्रवाशांच्या किंकाळ्यांनी परिसर हादरून गेला होता.

घटनेची माहिती मिळताच, स्थानिक लोक मदतीसाठी धावून आले. यासोबतच, बार्डोली अग्निशमन दलाचे पथक आणि बार्डोली शहर पोलिसांचा एक मोठा ताफा घटनास्थळी दाखल झाला आहे. अग्निशमन दलाकडून बसला लागलेली आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

जिल्हाधिकारी तेजस पटेल यांनी सांगितले की, हा अपघात दुपारी ४:३० वाजता झाला. सतरा जखमींवर बार्डोली प्राथमिक आरोग्य केंद्र रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांच्यापैकी कोणाचीही प्रकृती गंभीर नाही. जखमींना तीन वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर आणि स्टाफ नर्सेस सर्वांवर उपचार करत आहेत. सात जखमींना सुरत सिव्हिल रुग्णालयात पाठवण्यात आले असून, त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे.

### अपघातामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. मात्र, आगीची तीव्रता जास्त असल्याने बचाव कार्यात मोठे अडथळे येत होते. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, काही जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती.

# संपादकीय

## दोन गुराखी हवेत पगार लाखावर अर्ज हजारो!

चीनमध्ये अलीकडेच आलेली नोकरीची एक जाहिरात.. ही जाहिरात तशी साधीशीच. कोणत्या पदासाठी ही भरती होती? - तर गुराखी म्हणजे गुरं चारण्यासाठी माणसं हवीत म्हणून.. जागा किती होत्या? - तर फक्त दोन! या दोन पदांसाठी अक्षरशः हजारो अर्ज आले! एप्रिल महिन्याच्या शेवटी फार्म मालक झुआओ झियाओयाँग यांनी दक्षिण मंगोलियातील दुर्गम गवताळ भागात मेंढ्या, गुरं चारायला गुराख्यांसाठी ही नोकरीची जाहिरात दिली होती. अवघ्या तासाभरात या जाहिरातीला सातशेहून अधिक अर्ज मिळाले आणि उमेदवारांची संख्या वाढतच गेली. व्हीबोवर, म्हणजेच चीनच्या सोशल मीडिया मंचावर त्याला अल्पावधीत सहा कोटी व्ह्यूज मिळाले. गुराखी पदासाठी अर्ज करणाऱ्यांमध्ये कोण कोण असावं? - कारखान्यातील कामगार, कार्यालयीन कर्मचारी आणि शांघाय व चॉन्गकिंगसारख्या मोठ्या शहरांतील नुकत्याच पदवीधर झालेल्या असंख्य विद्यार्थ्यांचा यात समावेश होता. या प्रतिसादातून चीनच्या अर्थव्यवस्थेमधील दीर्घ कामाचे तास, अत्यल्प पगार आणि करिअरच्या घटत्या संधींबद्दल वाढती निराशा दिसून येत आहे. ज्यांनी ही जाहिरात दिली, ते फार्म मालक झुआओ यांनी सांगितलं, ही जाहिरात इतकी व्हायरल होईल, अशी मला अपेक्षा नव्हती. अनेक अर्जदारांनी कर्जांचं ओझं, थकून टाकणाऱ्या औद्योगिक नोकऱ्या आणि कामाच्या ठिकाणचा ताण याबद्दलही अर्जांमध्ये माहिती दिली होती. चीनचा अधिकृत बेरोजगारी दर पाच टक्क्यांपेक्षा थोडा जास्त असला, तरी अपुरा रोजगार आणि नोकरीतील असुरक्षितता वाढत आहे. कामगार देशातील 'नऊ-नऊ-सहा' कार्यसंस्कृतीवर सातत्याने टीका करत आहेत. 'नऊ-नऊ-सहा' म्हणजे काय? - तर आठवड्यातील सहा दिवस रोज सकाळी नऊ ते रात्री नऊपर्यंत काम करणं ! त्याचवेळी खासगी क्षेत्रातील वेतनवाढ आर्थिक विस्ताराशी जुळवून घेण्यात कमी पडत आहे. झुआओ यांचा प्रस्ताव मुख्यतः पगारामुळे चर्चेत आला. गुराख्यांना दरमहा आठ हजार युआन, म्हणजेच सुमारे १,१७८ डॉलर्स (सुमारे सव्वा लाख रुपये) दिले जाणार होते. हा पगार शहरी खासगी क्षेत्रात दिल्या जाणाऱ्या पगारापेक्षाही जास्त आहे. चीनचा राष्ट्रीय सरासरी पगार सहा हजार युआन आहे. याशिवाय मोफत निवास आणि अन्नधान्यही दिलं जाणार होतं. त्याबदल्यात कामगारांना तीन हजार मेंढ्यांची देखभाल करावी लागणार होती आणि उणे तीस अंश सेल्सिअसपेक्षाही कमी तापमानाच्या हिवाळ्याला सामोरं जावं लागणार होतं. फार्म मालक झुआओ यांनी इशारा दिला की, मी पगार नक्कीच जास्त देत आहे, पण या कामात कष्ट आहेत, हे काम अजिबात सुखकर नाही. शिवाय तुम्ही दीर्घकाळ काम करू शकता का आणि हिवाळा सहन करू शकता का, हीदेखील सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे.



## संस्कृत सुभाषित

यथा भूमिस्तथा तोयं, यथा बीजं तथाऽमुरः । यथा देशस्तथा भाषा, यथा राजा तथा प्रजा।।

अर्थ – भूमी जशी असते तसे पाणी असते. जसे बीज असते तशा प्रकारचा अंकुर असतो, जसा देश असतो तशी भाषा असते आणि जसा राजा वागतो, तसेच आचरण प्रजा करते.

## गुरु वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असते!

## उपदेशकथा

### मूळ स्वभाव जाईना

एका धोब्याजवळचे गाढव कमालीचे दुर्बल होते. धन्यालाच पैसा मिळत नसल्यानं गाढवाला कोण खाऊ घालणार? एके दिवशी धोब्याला वाघाचे कातडे मिळाले. त्याने आपल्या गाढवाच्या अंगावर पांघरले. त्याला वाटले, राखणदाराला वाटेल वाघ आला आहे. बिचाऱ्याला शेतात खाऊ देत मनसोक्त. गाढवाची मात्र खरोखरच चैन झाली. शेतात रात्री मनमुराद खावे व मस्त ताणून द्यावी, असा दिनक्रम खूप दिवस चालला. गाढव एव्हाना गलेलठ्ठ झाले. त्याला धडपणे पळता येईना. एके दिवशी दुरून त्याला गाढवाचा आवाज ऐकू आला. न राहवून त्यानंदेखील प्रतिसाद दिला. वाघाचे सोंग बाहेर आले. गाढवाच्या ओरडण्याने राखणदार जागा झाला आणि गाढवाला चांगलाच चोप मिळाला.

कथा उपदेश : आपला मूळ स्वभाव जात नाही. वाणीच्या दोषाने गाढवाला चांगलाच मार मिळाला.

## सुविचार

क्षोभ, दु:ख, आनंद, व एकांत यांच्या मध्यात मी स्वत:ला प्रत्येक क्षणी स्मरण करुन देत असतो की माझ्या आयुष्याचं एकमेव ध्येय हे त्या अंतिम प्रश्नकर्त्याचा शोध घेणं हे आहे; तो अकल्पनीय ज्याने मला या भाऊगर्दीत एक अशक्यप्राय असं कोडं सोडविण्यासाठी ठेवलं आहे.

– केदार जोशी

## पंचांग

| पंचांग | कृष्ण पक्ष |
|---|---|
| ३ जून २०२६ | तिथि:तृतीया २१:२१:३० |
| बुधवार | नक्षत्र:पूर्वाषाढा |
| विक्रम संवत्– २०८२ | २४:५९:२७+ |
| अधिक ज्येष्ठशके | योग:शुभ ०८:११:३७ |
| संवत्– १९४८ | करण:वणिज ०८:१२:१९ |
| संवत्सर –पराभवनाम | करण:विष्टि २१:२१:३० |
| अयन– उत्तरायणारंभ | सूर्य:वृषभ |
| मास–अधिक ज्येष्ठ | चन्द्र:धनु |
| ऋतु– सौर ग्रीष्म | हिजरी सन् – १४४७ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 7 | 9 | | 4 | | | |
| 5 | 9 | | 2 | 1 | | 3 | | |
| | 2 | 8 | | 5 | | | | 1 |
| | 7 | | | | | | 4 | 3 |
| 3 | | 4 | | 2 | | 5 | | 9 |
| 9 | 8 | | | | | | 6 | |
| 7 | | | | 9 | | 4 | 5 | |
| | | 2 | | 3 | 1 | | 7 | 6 |
| | | | 4 | | 2 | 1 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९६६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6 | 9 | 7 | 4 | 8 | 2 | 3 | 5 |
| 4 | 2 | 5 | 1 | 3 | 9 | 8 | 7 | 6 |
| 7 | 3 | 8 | 2 | 6 | 5 | 1 | 9 | 4 |
| 6 | 8 | 4 | 3 | 9 | 2 | 5 | 1 | 7 |
| 9 | 7 | 3 | 5 | 1 | 6 | 4 | 8 | 2 |
| 2 | 5 | 1 | 4 | 8 | 7 | 3 | 6 | 9 |
| 8 | 1 | 2 | 6 | 7 | 4 | 9 | 5 | 3 |
| 5 | 9 | 7 | 8 | 2 | 3 | 6 | 4 | 1 |
| 3 | 4 | 6 | 9 | 5 | 1 | 7 | 2 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०३५० – नेपोटियानसने रोममध्ये घुसून स्वत:ला सम्राट घोषित केले.
- १०९८ – पहिली क्रुसेड – आठ महिने चाललेल्या वेढ्यानंतर क्रुसेडरांनी अँटियोक शहर जिंकले.
- १५३९ – हेर्नान्दो दि सोटोने फ्लोरिडा स्पेनचा भाग असल्याचे जाहीर केले.
- १६६५ – जेम्स स्टुअर्टने नेदरलँडच्या आरमाराला हरवले.
- १८६४ – अमेरिकन गृहयुद्ध – कोल्ड हार्बरची लढाई.
- १८८९ – कॅनेडियन पॅसिफिक रेल्वेने कॅनडाचे दोन्ही तीर जोडले.

### राष्ट्रीय

- १९८४ – ऑपरेशन ब्ल्यु स्टार – भारतीय सैन्याने आत घुसलेल्या अतिरक्यांना हुसकावण्यासाठी अमृतसरच्या सुवर्णमंदिरावर हल्ला चढवला.
- २००७ – रेसर नारायण शंकरच्या नेतृत्वात रॅम्स संघाने जेके टायर जूनियर रेसिंग चषकाचे विजेतेपद जिंकले.

### जन्म

- १८९० – प्रसिद्ध चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, चित्रकार आणि शिल्पकार कलामहर्षी बाबूराव पेंटर यांचा जन्म.
- १८९० – सरहदी गांधी म्हणुन प्रसिद्ध असलेले खान अब्दुल गफ्फारखान यांचा जन्म.

### निधन

- १९७७ – आर्किबाल्ड विविअन हिल, ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते.
- २००० – डॉ. आर. एस. अय्यंगार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ व महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचे संचालक.
- २००७ – रत्नमाला, प्रसिद्ध तामिळ अभिनेत्री.

## : SMS :

Kaali ghata
chayi hai,
Aaj fir biwi se
maar khayi hai.
Kehti hai sudhar jao.
Par meri galti nahi,
Baju wali aaj Mini
Skirt mai aayi hai..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.७ | २८.८ |
| अहमदनगर | ३७.५ | २५.५ |
| अकोला | ४३.५ | ३१.८ |
| अमरावती | ४१.४ | ३०.२ |
| बीड | ४३.८ | ३१.२ |
| भंडारा | ४२.३ | २९.२ |
| बुलढाणा | ३६.९ | २३.५ |
| चंद्रपूर | ४२.७ | ३१.९ |
| चेन्नई | ४४.९ | ३१.५ |
| नवी दिल्ली | ३६.८ | २७.६ |
| धुळे | ४२.३ | २९.३ |
| गोंदिया | ४०.४ | ३०.२ |
| जळगाव | ४३ | ३१ |
| कोल्हापूर | ३६.९ | २४ |
| लातूर | ३७.९ | २५.९ |
| मुंबई | ४०.७ | ३५.६ |
| नागपूर | ४१.८ | २९ |
| नांदेड | ४१.३ | ३०.७ |
| नंदूरबार | ४० | २९.३ |
| नाशिक | ३७.९ | २५.१ |
| पुणे | ३६.१ | २४.५ |
| पंढरपूर | ३९.६ | २९.३ |
| सातारा | ३७.४ | २२.८ |
| सांगली | ३९ | २४.८ |
| सोलापूर | ३९.९ | २८.३ |
| वर्धा | ४२.४ | ३१.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर बुद्धि चातुर्याने कामे केल्यास आजचा दिवस चांगला सिद्ध होऊ शकेल.

**तुळ :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम धाडसाने विरोधकांचा पराभव करु शकाल. सामाजिक कौतुकाने आनंद होईल.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर वाद–विवाद आणि भांडणांनी मानसिक त्रास वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर सामाजिक कार्यात आपला सहभाग राहील. महत्वाची कामे पूर्ण करु शकाल.

**मिथुन :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर जवळच्या व्यक्तींकडून उपयोगी सल्ला मिळेल. राज्यपक्षच्या कामासाठी दिवस चांगला राहील.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम वेळेवर कामे न झाल्यामुळे चिंता वाढेल. खर्च अधिक होईल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा: पश्चिम आर्थिक लाभ झाल्याने आनंद होईल. नोकरीत बढती मिळण्याचे योग येतील.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण जुनी समस्या दूर होण्याची शक्यता आहे. दृढ निश्चय असल्या कारणाने प्रत्येक क्षेत्रात यश मिळेल.


**सिंह :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : पश्चिम कुंटूबासमवेत वेळ मनोरंजनात जाईल. व्यापारात नवीन संबंध जुळून येतील, जे भविष्यात फायदेशीर ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर कौटूंबिक तसेच संपत्ती संबंधातील अडचणींचे समाधान शक्य आहे. मिळकतीत वाढ होईल.

**कन्या :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण आपल्या प्रयत्नांनी घरगूती समस्या सुटतील. आर्थिक स्थिती उत्साहवर्धक राहील.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर सज्जन माणसांचा सहवास लाभेल. अभ्यासात मन रमेल. समाजात मान प्रतिष्ठा तसेच लोप्रियता मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६७



### आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज, २३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

### उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत
२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत
४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

### जम्बो शब्दकोडे क्र. ९६६ चे उत्तर

आडवे उत्तर १.परमप्रिय ४.अवयव ७.मसनद १०.यमन १२.मग १३.पराभूत १५.वर्षाव १६.वार्ताहार १८.दीन १९.मानस २१.रक्षा २३.पाटील २५.वर २८.लवकर ३१.आटपाटनगर ३३.नजर ३४.वाटेकरी ३६.टाक ३७.कटु ३८.नद ३९.मम ४१.मनगट ४३.काका ४४.कळक ४६.धुरकट ४८.पाटावरवंटा ५१.पारवा ५२.राम ५४.दक्षता ५६.नाराज ५८.तमाशा ६०.नवीन ६१.रीस ६४.उमा ६५.मखर ६६.मावळण ६७. विमानतळ ६८.नड ६९.जवळ ७०.आरपार ७२.सागवान ७३.खीर ७४.कयास ७५.तातडी ७६.चळ ७७.मोक्ष ७८.वटवट

उभे उत्तर : १.पदोपदी २.प्रियतमा ३.यम ५.वरवर ६.वणवा ८.समर ९.दमदाटी ११.नवस १४.रानवट १७.हजर २०.नयन २२.क्षालन २३.पागोटे २४.लहरी २६.रपाटा २७.भरकटणे २९.वजनकाटा ३०.कर ३१.आराम ३२.टकमक ३४.वाद ३५.कमळ ३८.नगर ४०.मधुर ४२.नटराज ४३.कापा ४४.कटाक्ष ४५.कट्टा ४७.रवाना ४९.वसनवाट ५०.वंदन ५१.पावा ५३.सीमा ५५.तारीख ५७.रावण ५८.तमा ५९.शाळामास्तर ६२.सरदार ६३.आवड ६४.उपवन ६५.मग्रूर ६६.मानवता ६९.जवान ७०.आसव ७१.पालव ७२.साडी ७३.खीळ ७४.कक्ष

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### शिवसेनाभवनमध्ये सुरु होणार मोफत अभ्यास वर्ग आणि अभ्यासिका : डॉ. नीलम गोऱ्हे

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहरातील शिवसेना भवन मध्ये सुरू होणार विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासवर्ग आणि अभ्यासिका दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या वाटा या विषयावर व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ गोऱ्हे यांनी सांगितले दहावी बारावीनंतर नेमकं काय करिअर निवडायचे असा प्रश्न अनेकांना पडतो आजकालच्या स्पर्धेच्या जगामध्ये सर्व पालकांना आपला मुलगा किंवा मुलगी सेटल व्हावे असे वाटते म्हणून विद्यार्थ्यांनी कठोर परीक्षण करून आपल्या करिअरमध्ये नावलौकिक करून आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना पुणे शहर जिल्हा शिक्षक शिक्षकेतर संघाचे प्रमुख अनिल गडकरी सर, निलेश जगताप, अश्विनी मटारे, यांनी केले. या कार्यक्रम प्रसंगी शिक्षकतज्ञ व समुपदेशक अनिल गुंजाळ सर, विजय कचरे सर सहशिक्षक समुपदेशक यांची विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना निवडणूक राज्य समन्वयक व धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष राज्य प्रमुख वैभव वाघ, संदीप शिंदे, प्रकाश ढमढेरे, विश्वास दिघे सुधीर जोशी सुदर्शना त्रिगुणाताई आदी उपस्थित होते.



### सांडपाणी वाहिनी तुंबल्याने दुर्गंधी; पावसाळा तोंडावर तरीही नालेसफाईची कामे अपूर्ण

हडपसर (दैनिक संध्या) : महंमदवाडी रस्त्यावरील सय्यदनगर येथे सांडपाणी वाहिनी तुंबल्याने घाण पाणी मुख्य रस्त्यावर आले आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, महापालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. सय्यदनगर भागात गेल्या अनेक वर्षांपासून सांडपाणी वाहिनीची समस्या कायम आहे. येथील जुन्या वाहिन्यांची वहन क्षमता कमी असून, हॉटेल व्यावसायिकांकडून टाकला जाणारा कचरा व प्लॅस्टिकमुळे चेंबर वारंवार तुंबत आहेत. सध्या रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे पादचाऱ्यांना कसरत करावी लागत असून, डासांच्या वाढत्या प्रमाणामुळे डेंगी व हिवतापाची भीती व्यक्त होत आहे. वीस दिवसांपूर्वी तक्रार केल्यानंतर कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाने तात्पुरती दुरुस्ती केली होती. मात्र, कायमस्वरूपी उपाययोजना न केल्याने पुन्हा ही स्थिती ओढवली आहे. पावसाळा तोंडावर असतानाही नालेसफाईची कामे अपूर्ण आहे. प्रशासनाने अनधिकृत हॉटेलवर कारवाई करावी आणि सांडपाणी वाहिनीची समस्या युद्धपातळीवर सोडवावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

### JEE Advanced 2026 मध्ये बाकलीवाल ट्युटोरियल्सची दमदार कामगिरी



पुणे (दैनिक संध्या) : JEE Advanced 2026 परीक्षेत बाकलीवाल ट्युटोरियल्स (BT) ने पुन्हा एकदा उल्लेखनीय यशाची परंपरा कायम राखली आहे. संस्थेचा विद्यार्थी आदित्य ठाकूर याने अखिल भारतीय क्रमवारीत (AIR) 162 वा क्रमांक मिळवत BT मधील सर्वोच्च मानांकन पटकावले. तर सिद्धार्थ आठल्ये याने AIR 185 मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली. याशिवाय सृजल भुते (AIR 218), आदी महाजन (AIR 253) आणि अवनीश खोलकर (AIR 359) यांनीही अखिल भारतीय टॉप 400 मध्ये स्थान मिळवले. या विद्यार्थ्यांपैकी पहिल्या चार विद्यार्थ्यांनी अनुक्रमे पुणे रँक 2, 3, 4 आणि 5 मिळवली. संस्थेच्या माहितीनुसार, यंदा BT च्या 14 विद्यार्थ्यांनी AIR टॉप 1000 मध्ये, 67 विद्यार्थ्यांनी AIR टॉप 4000 मध्ये, तर तब्बल 145 विद्यार्थ्यांनी AIR टॉप 10000 मध्ये स्थान मिळवले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे निकाल संकलित करण्याचे काम सुरू असून संपूर्ण निकाल लवकरच संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. टॉप 1000, टॉप 3000, टॉप 5000, टॉप 10000 तसेच एकूण यशस्वी विद्यार्थ्यांच्या संख्येच्या बाबतीत यंदाही पुण्यातील इतर संस्थांच्या तुलनेत BT ने सर्वोत्तम कामगिरी केल्याचा दावा संस्थेने केला आहे. निकालाबाबत प्रतिक्रिया देताना बाकलीवाल ट्युटोरियल्सचे संचालक वैभव बाकलीवाल म्हणाले, "दरवर्षी हे निकाल पाहताना माझ्या मनात कृतज्ञतेची भावना दाटून येते. हे यश केवळ आकडेवारीपुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांचे, पालकांच्या विश्वासाचे आणि शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण अध्यापनासाठीच्या समर्पणाचे प्रतीक आहे." संस्थेने विद्यार्थ्यांमध्ये संकल्पनात्मक स्पष्टता, प्रभावी समस्या निराकरण कौशल्ये आणि मानसिक स्थैर्य विकसित करण्यावर सातत्याने भर दिल्यामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. अनुभवी शिक्षकवर्ग, अभ्यासपूर्ण अध्ययन साहित्य, नियमित चाचण्या, प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण आणि वैयक्तिक शंका निरसन सत्रे ही BT च्या प्रशिक्षण व्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे संस्थेने नमूद केले. बाकलीवाल ट्युटोरियल्सने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### 25 वर्षांत 1400 वेळा सिंहगड चढले रामदास मुरकुटे, सत्तरीच्या उंबरठ्यावरही ध्यास..

पुणे (दैनिक संध्या) : निसर्गप्रेम, जिद्द आणि सातत्य यांचे प्रेरणादायी उदाहरण ठरलेल्या रामदास मुरकुटे यांनी गेल्या २५ वर्षांत तब्बल १४०० हून अधिक वेळा सिंहगड सर करण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुरकुटे यांनी मित्र अप्पा मुंगारे यांच्यासोबत वाढदिवसानिमित्त २ जून २००१ या दिवशी प्रथमच सिंहगड सर केला अन् हा गड त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला. पहिल्या ट्रेकनंतर त्यांची सिंहगडाविषयी निर्माण झालेली ओढ दिवसेंदिवस वाढत गेली. त्यानंतर त्यांनी प्रत्येक शनिवारी सिंहगडावर जाण्याचा नियमच बनवला. एखाद्या कारणामुळे शनिवारचा ट्रेक चुकल्यास रविवारी गडावर जाऊन ती उणीव भरून काढण्याची परंपरा त्यांनी कायम ठेवली. या सातत्यातून त्यांनी २५ वर्षांच्या कालावधीत १४०० हून अधिक वेळा सिंहगडाची चढाई पूर्ण केली आहे. मुरकुटे यांच्या मते, सिंहगड हा केवळ ट्रेकिंगचा विषय नसून आत्मसंवाद, निसर्गाशी नाते आणि इतिहासाशी जोडणारी एक प्रेरणादायी जागा आहे. नियमित ट्रेकिंग, व्यायाम, प्राणायाम आणि शाकाहारी आहारामुळे आयुष्यात शिस्त, मानसिक शांतता आणि उत्तम आरोग्य लाभल्याचे ते सांगतात. लवकरच सत्तरीत पदार्पण करणार असलेल्या मुरकुटे यांचा उत्साह आजही तरुणांना लाजवेल असा आहे. प्रत्येक शनिवारची दुपार झाली की त्यांचे मन आजही सिंहगडाकडे धाव घेते.

# पादचाऱ्यांचा जीवघेणा प्रवास थांबणार!

**पुण्यातील चांदणी चौकातील पुलाचे काम अंतिम टप्प्यात; जूनअखेर खुला होणार**




**कोथरूड (दै. संध्या)**

एनडीए (चांदणी) चौकातील पादचारी पुलाचे काम आता अंतिम टप्प्यात आले असून, जूनअखेर हा पूल नागरिकांसाठी खुला होण्याची शक्यता आहे. मेट्रो प्रशासनाच्या प्रस्तावामुळे रखडलेले हे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पुन्हा वेगाने सुरू केले आहे. चांदणी चौकात प्राधिकरणाने आठ रॅम्पसह मुख्य रस्ता बांधल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटला आहे. मात्र, या मार्गावरून दररोज सुमारे एक लाख वाहनांची वर्दळ असते. मुंबईकडे जाणाऱ्या बस पकडण्यासाठी किंवा रस्ता ओलांडण्यासाठी येथे पादचारी पूल नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. रस्ता रुंद झाल्यामुळे आणि वाहनांचा वेग अधिक असल्याने रस्ता ओलांडणे धोकादायक ठरत होते. यापूर्वी येथे अपघातात पादचाऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे हा पूल लवकर पूर्ण करण्याची मागणी स्थानिक नागरिक करत होते.

मेट्रो प्रशासनाकडून एक 'स्काय वॉक' बांधण्याचा आणि तो प्राधिकरणाच्या पुलाला जोडण्याचा प्रस्ताव आल्यामुळे हे काम लांबणीवर पडले होते. डिसेंबर २०२४ पर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, मेट्रोच्या कामाला विलंब होत असल्याचे पाहून प्राधिकरणाने मेट्रोचा प्रस्ताव नाकारला आणि स्वतःच्या पादचारी पुलाचे काम स्वतंत्रपणे सुरू केले.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे सुमारे १२५ मीटर लांबीचा आणि ६.६ मीटर रुंदीचा पूल बांधण्यात येत आहे. मुंबईच्या दिशेकडील बसथांब्यापासून ते इराणी हॉटेलच्या दिशेपर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. आता हॉटेलच्या बाजूला लोखंडी जिना जोडण्याचे काम शिल्लक आहे. हे काम १५ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

> येथे वाहनांचा वेग जोरात असतो आणि रस्ता ओलांडण्याची सोय नाही. त्यामुळे महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचे हाल होतात. पादचारी मार्ग लवकर सुरू झाल्यास मोठा दिलासा मिळेल.
>
> **- सचिन मुरमुरे, नागरिक, कोथरूड**
>
> प्राधिकरणातर्फे पादचाऱ्यांसाठी नवीन पूल बांधण्याचे काम सुरू आहे. इराणी हॉटेलच्या बाजूला लोखंडी जिना जोडण्याची तयारी सुरू असून १५ जूनपर्यंत हे काम पूर्ण करण्यात येईल.
>
> **- अमोल भुरे, प्रकल्प अभियंता, चांदणी चौक**

## दिव्यांग उमेदवारांना लेखनिकासाठी ५ जूनपर्यंत पूर्वपरवानगी बंधनकारक

**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात येणाऱ्या 'महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६' मध्ये दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची मदत अथवा भरपाई वेळ मिळवण्यासाठी ५ जूनपर्यंत पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक केले आहे. केवळ ऑनलाइन मुख्य अर्जात या सवलतीचा दावा करणे पुरेसे नसून, आयोगाची स्वतंत्र लेखी परवानगी असल्याशिवाय परीक्षा केंद्रावर ही सवलत दिली जाणार नाही, असे आयोगाने स्पष्ट केले. आयोगाने सोमवारी (ता. १) परिपत्रक प्रसिद्ध केले. लेखनिकाची मदत किंवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या उमेदवारांनी विनंती अर्ज आवश्यक कागदपत्रांसह pre-examination@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर ५ जूनपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. आयोगाच्या परिपत्रकानुसार, दिव्यांग उमेदवाराने परीक्षेसाठी सोबत आणलेल्या लेखनिकाची कमाल शैक्षणिक अर्हता केवळ १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांना प्रपत्र १ किंवा प्रपत्र २, लक्षणीय दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र आणि नमुना क्रमांक ११ ही कागदपत्रे ई-मेलद्वारे सादर करावी लागतील. मात्र, अंधत्व, दोन्ही हात बाधित असलेले किंवा दोन्ही हात नसलेले शारीरिक दिव्यांगत्व आणि मेंदूचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांना नमुना क्रमांक ११ सादर करण्यापासून सूट दिली आहे. उमेदवारांसाठी आवश्यक असणारे विहित प्रपत्र १, प्रपत्र २ आणि नमुना क्रमांक ११ आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.mpsc.gov.in उपलब्ध करून दिले आहेत.

## दिलीप वळसेंकडून विलास लांडेंच्या मनधरणीचा प्रयत्न?

**पुणे (दै. संध्या)**


पुणे विधानपरिषद निवडणुकीच्या उमेदवारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नाराजीचे सूर उमटू लागले असताना माजी आमदार विलास लांडे यांच्या घरी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी भेट दिल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विक्रम काकडे यांना केवळ आर्थिक निकषाच्या आधारे उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप करत लांडे यांनी पक्ष नेतृत्वावर थेट टीका केली होती. त्यानंतर वळसे पाटील यांनी लांडे यांची भेट घेतल्याने ही नाराजी दूर करण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा रंगली आहे. मात्र, या भेटीबाबत बोलताना दिलीप वळसे पाटील म्हणाले की, "मी विलास लांडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आलो आहे. ते नाराज नाहीत," असे स्पष्ट केले. तसेच पुणे विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षात काही नेते नाराज असतील, तर त्यांची खदखद दूर करण्यासाठी योग्य मार्ग काढला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना वळसे पाटील यांनी सुनील टिंगरे यांचा अर्ज हा डमी अर्ज असल्याचे सांगितले. तसेच कोणतीही वेगळी भूमिका घेत असल्याची माहिती आपल्यापर्यंत नसल्याचे नमूद केले.

## मुलांसाठी 'रोबोटिक्स आणि इनोव्हेशन' कार्यशाळा

**एक मनोरंजक वीकेंड अनुभव; जिथे लहान मुले तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिकतील, बनवतील आणि शोधतीलही**

**पुणे (दै. संध्या)**

'नेक्सस वेस्टएंड मॉल' पुण्यातील सर्व लहान मुलांसाठी एक सुवर्णसंधी घेऊन येत आहे. मॉलने खास मुलांसाठी 'रोबोटिक्स आणि इनोव्हेशन वर्कशॉप'चे आयोजन केले असून, याद्वारे मुलांना नावीन्यपूर्ण शोध, सर्जनशीलता आणि प्रत्यक्ष शिकण्याच्या एका रोमांचक जगात प्रवेश करता येणार आहे. इयत्ता तिसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेल्या या कार्यशाळेत, बाल संशोधकांना जून महिन्यातील प्रत्येक वीकेंडला (शनिवारी-रविवारी) परस्परसंवादी उपक्रम आणि रिअल-टाइम प्रयोगांद्वारे रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि स्टेमचे आकर्षक जग अनुभवण्याची संधी मिळेल.



औंध येथील नेक्सस वेस्टएंड मॉल मध्ये प्रत्येक मुलासाठी ४९९ रुपये शुल्क असलेल्या या कार्यशाळेत दोन अत्यंत मनोरंजक मॉड्युल्सचा समावेश आहे.

वायरलेस आरसी कार बिल्डिंग: यामध्ये मुले स्वतः रिमोट-कंट्रोल कार जोडायला आणि त्याचे कार्य समजून घ्यायला शिकतील. सोबतच गती, मेकॅनिक्स आणि वायरलेस तंत्रज्ञानाशी संबंधित संकल्पना देखील जाणून घेतील.

बेसिक इलेक्ट्रॉनिक्स सर्किट बिल्डिंग : यामध्ये सहभागी मुले कार्यरत सर्किट्स तयार करतील आणि इलेक्ट्रॉनिक घटक वास्तविक जीवनात कसे काम करतात हे समजून घेतील.

'बॉटब्रूज एड्युटेक'मधील अनुभवी मार्गदर्शक आणि आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त रोबोटिक्स शिक्षकांद्वारे या सत्रांचे संचालन केले जाईल. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे 'स्टेम' संकल्पना सोप्या करणे; तसेच मुलांमध्ये सर्जनशीलता, तार्किक विचार, आत्मविश्वास आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करणे, या उद्देशाने या सत्रांची रचना करण्यात आली आहे. तर मग, या वीकेंडला 'नेक्सस वेस्टएंड मॉल'ला नक्की भेट द्या आणि तुमच्या घरातील लहान इनोव्हेटर्सना रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, सर्जनशीलता आणि नवनवीन शोधांच्या दुनियेत विहार करू द्या

## एअर इंडियाने कामावरून कमी केलेल्या कामगारांना नुकसान भरपाई द्यावी

**भारतीय मजदूर संघाची केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे मागणी**

**पुणे (दै. संध्या)**

एअर इंडिया (सध्या टाटा समूहाच्या व्यवस्थापनाखाली) कंपनीने मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, गोवा आणि हैदराबाद विमानतळांवर ३० ते ३५ वर्षांपासून ग्राउंड हँडलिंग व इतर सेवा देणाऱ्या ६०० हून अधिक कामगारांना न्यायालयीन आदेशांचा अवमान करून २०१९ व २०२५ मध्ये अचानक कामावरून कमी केले. या निर्णयामुळे शेकडो कामगार व त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून अनेकांचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे,असा आरोप भारतीय मजदूर संघाने केला आहे.

या अन्यायग्रस्त कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय मजदूर संघ सातत्याने संघर्ष करीत आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य ॲड. श्रीपाद कुटासकर आणि महाराष्ट्र प्रदेश सचिव अविनाश खोत यांनी केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची पुणे येथील निवासस्थानी भेट घेऊन या कामगारांच्या प्रश्नांकडे त्यांचे लक्ष वेधले. यावेळी एअर इंडियाकडून कामगारांवर झालेल्या अन्यायाची सविस्तर माहिती देण्यात आली. अनेक दशके सेवा बजावूनही कामगारांना कोणतीही रोजगार सुरक्षा न देता अचानक सेवेतून कमी करण्यात आले.



तसेच अनेक कामगारांचे प्रॉव्हिडंट फंड, इतर वैधानिक देणी आणि नुकसानभरपाईचे प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले. भारतीय मजदूर संघाने या सर्व कामगारांना न्याय्य नुकसानभरपाई, प्रलंबित प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम आणि इतर वैधानिक लाभ तातडीने देण्यात यावेत, अशी मागणी केली. तसेच या प्रश्नाच्या कायमस्वरूपी तोडग्यासाठी भारतीय मजदूर संघाच्या पदाधिकाऱ्यांसह बैठक आयोजित करण्याची मागणीही करण्यात आली.

या विषयाची गांभीर्याने दखल घेत केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी लवकरच व्यवस्थापन, शासन आणि कामगार संघटना यांची त्रिपक्षीय बैठक आयोजित करण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. कामगारांच्या नुकसानभरपाईसह इतर प्रलंबित प्रश्नांवर न्याय्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

या आश्वासनामुळे गेल्या अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या ६०० हून अधिक कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळेल,असा विश्वास भारतीय मजदूर संघाचे नेते ॲड श्रीपाद कुटासकर आणि अविनाश खोत यांनी व्यक्त केला. अशी माहीती मिडीया प्रमुख सागर पवार यांनी दिली आहे.

## दैनंदिन अंघोळीत आता त्वचेच्या विशेष काळजीचा स्पर्श

**पुणे (दै. संध्या)**

भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह आणि डॉक्टरांनी सर्वाधिक शिफारस केलेल्या बेबी केअर ब्रँडपैकी एक असलेल्या 'हिमालया बेबीकेअर'ने 'हिमालया जेंटल बेबी सोप' आणि 'रिफ्रेशिंग बेबी सोप' या दोन उत्पादनांसाठी दोन नवीन जाहिराती प्रदर्शित केल्या आहेत. "मोअर दॅन क्लीन्सिंग. इट्स केअर." या संदेशासह बेबी सोपचा हा पोर्टफोलिओ नव्या पद्धतीने कंपनीने सादर केला आहे. कंपनीचे हे महत्त्वाचे धोरण मानले जात आहे. नवजात बाळांच्या त्वचेच्या गरजांची कंपनीला असलेली सखोल जाण लक्षात घेऊन करण्यात आलेला हा बदल आजच्या पालकांच्या बदलत्या अपेक्षांशी सुसंगत असल्याचे दिसून येते. या पालकांना केवळ सुरक्षित उत्पादने नको असतात, तर नवजात बाळांसाठी आणि लहान मुलांसाठी दैनंदिन वापरता येतील अशी सौम्य स्वरुपाची काळजी घेणारी, तसेच ऋतू बदलांदरम्यान त्वचेची जपणूक करणारी विशेष उत्पादने हवी असतात.




'जेंटल बेबी सोप'वरील ही फिल्म एका शांत आणि भावनिक क्षणातून पुढे सरकते. एक आई आपल्या नवजात बाळाला अंघोळ घालण्याची तयारी करत असते. साधा वाटणारा हा दैनंदिन क्षणही तिच्यासाठी काळजी, जबाबदारी आणि योग्य निवड करण्याच्या चिंतेने भरलेला असतो. बाळाला अलगद हातात घेताना तिच्या मनात एक परिचित प्रश्न उमटतो – "कैसे करूं सही साबुन का सिलेक्शन?" नवजात बाळाच्या त्वचेबाबत अगदी छोट्या निर्णयालाही किती महत्त्व असते, ही भावना या कथानकातून सहजपणे मांडण्यात आली आहे.

# 'झेप' उपक्रमाच्या चौथ्या वर्षाची प्रेरणादायी सुरुवात उत्साहात

## डॉ. नंदकुमार पालवे व सौ. आरती पालवे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पुणे (दै. संध्या)**

पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ संस्थापित "सप्तसिंधू" महिला आधार, बालसंगोपन व शिक्षण संस्था संचलित सन्मती बाल निकेतन आणि तिर्थरूप शैक्षणिक वसतिगृह यांच्या वतीने आयोजित 'झेप' या विशेष उपक्रमाची सुरुवात सोमवार, दि. १ जून २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे हे सलग चौथे वर्ष असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांचे अनुभव आणि प्रेरणादायी विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य या माध्यमातून सातत्याने केले जात आहे.



यावर्षीच्या 'झेप' उपक्रमाच्या उद्घाटन सत्रासाठी सेवासंकल्प प्रतिष्ठान, बुलढाणा येथील डॉ. नंदकुमार पालवे आणि सौ. आरती पालवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. "भवताल समजून घेताना" या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांशी अत्यंत हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी संवाद साधला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. पालवे यांनी पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ (माई) यांच्या स्मृतींना अभिवादन करताना, माई म्हणजे समाजासाठी दीपस्तंभ असल्याचे सांगितले. त्यांच्या कार्यामुळे हजारो निराधार, अनाथ आणि वंचित मुलांच्या आयुष्याला दिशा मिळाली असून, माईंच्या कार्यभूमीत येऊन त्यांच्या लेकरांसमोर संवाद साधण्याची संधी मिळणे हा स्वतःसाठी अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा क्षण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मानसिक आरोग्य आणि भावनिक संतुलन या विषयावर बोलताना डॉ. पालवे यांनी प्रत्येकाच्या आयुष्यात किमान एक तरी सच्चा मित्र असणे किती आवश्यक आहे, यावर भर दिला. "तुमच्याकडे किती मित्र आहेत यापेक्षा एक तरी सच्चा मित्र आहे का, हे अधिक महत्त्वाचे आहे," असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. मनातील भावना व्यक्त करण्यासाठी आणि दुःख वाटून घेण्यासाठी विश्वासू व्यक्ती असणे ही मानसिक स्वास्थ्याची मूलभूत गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सौ. आरती पालवे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कृतज्ञतेचे महत्त्व अधोरेखित केले. "थँक्यू" आणि "सॉरी" हे दोन साधे शब्द नात्यांमध्ये सकारात्मकता निर्माण करतात, असे सांगत त्यांनी आपल्या आयुष्यासाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तीप्रती कृतज्ञ राहण्याचा संदेश दिला. कृतज्ञता ही व्यक्तिमत्त्व समृद्ध करणारी आणि जीवन अधिक सुंदर बनविणारी भावना असल्याचे त्यांनी नमूद केले.

दोन्ही मान्यवरांचे मार्गदर्शन विद्यार्थी अत्यंत एकाग्रतेने आणि उत्सुकतेने ऐकत होते. त्यांच्या संवादातून विद्यार्थ्यांना संवेदनशीलता, सकारात्मकता, मैत्री, कृतज्ञता आणि मानसिक आरोग्य यांचे महत्त्व नव्याने समजले.

या प्रसंगी द मदर ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. विनयदादा सपकाळ यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या अध्यक्षा ममता सिंधुताई सपकाळ यांनी केले. 'झेप' या उपक्रमामागील संकल्पना तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी या उपक्रमाचे महत्त्व त्यांनी उपस्थितांसमोर विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्मा शिंदे यांनी केले, तर काशिनाथ सर यांनी आभार प्रदर्शन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### निवडणुकीची रणनीती आखण्यासाठी नगरसेवकांसमवेत बैठक संपन्न



मुंबई (दैनिक संध्या) : पुणे स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषदेच्या निवडणुकीची रणनीती आखण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे, पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्तीताई चवधरी, काँग्रेस पक्षाचे पुणे मनपाचे गटनेते चंदूशेठ कदम, राष्ट्रवादीचे गटनेते काका चव्हाण व दोन्ही पक्षांच्या नगरसेवकांसमवेत काँग्रेस भवन येथे बैठक संपन्न झाली. महाविकास आघाडीच्या महत्त्वाच्या नेत्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, खासदार सुप्रियाताई सुळे यांनी आज पुणे येथील ऐतिहासिक काँग्रेस भवनला भेट दिली. या प्रसंगी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या व माजी महापौर जिल्हा पुणे पश्चिम विभागाच्या नवनियुक्त शहराध्यक्षा दीप्तीताई चवधरी, ज्येष्ठ नेते अंकुश काकडे आणि चंदूशेठ कदम यांनी त्यांचे स्वागत केले. या सदिच्छा भेटीदरम्यान नेत्यांमध्ये आगामी राजकीय दिशा, महाविकास आघाडीची पुढील रणनीती आणि पुण्याच्या स्थानिक विकासात्मक मुद्द्यांवर सकारात्मक व सविस्तर चर्चा झाली. नगरसेवकांनी या बैठकीमध्ये महत्वाचे प्रश्न मांडले तसेच महाविकास आघाडीची वज्रमूठ अधिक मजबूत करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. यानंतर पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांशी आपले मनोगत व्यक्त करीत असताना खा. सुप्रिया सुळे, “महाविकास आघाडी म्हणून महापालिकेमध्ये विरोधकाची भूमिका अत्यंत योग्य रितीने राबविणार आहोत. पुणेकरांचे प्रश्न आम्ही प्रामुख्याने घेऊन पुण्याच्या विकासासाठी आम्ही कटीबध्द आहोत.

### पीक विमा की शेतकऱ्यांची थट्टा? 2 हजार रुपये भरले, पण भरपाई मिळाली फक्त 1300

चुल्हाड (सिहोरा) (दैनिक संध्या) : खरीप हंगामात धानाच्या पिकांना सुरक्षा कवच देण्यासाठी शेतकऱ्यांनी पीक विमा काढले. बँकांनी पीक कर्ज वाटप करताना पीक विम्याची २ टक्के रक्कम कपात केली. धानाचे अवकाळी पावसाने नुकसान केले. पीक विम्याची नुकसान भरपाई देताना आखडती मदत शेतकऱ्यांना देण्यात आली. यानंतर रेंगेपार येथील शेतकऱ्यांना डोक्यावर हात ठेवण्याची पाळी आली आहे. लागवड केलेल्या धान व अन्य पिकांना सुरक्षा कवच देण्यासाठी पीक विम्याची राशी कपात करण्यात येत आहे. रेंगेपार येथील शेतकरी शंकर नागपुरे यांनी ५ एकर शेतात धान पिकांची लागवड केली. खरीप हंगामात पीक कर्ज घेताना पीक विम्याचे २ टक्के राशी कपात करण्यात आली. यासाठी पीक विम्याचे २ हजार रुपये कपात केले. किसना नागपुरे व कैलास नागपुरे या शेतकऱ्यांनी धान पिकांना पीक विम्याचे सुरक्षा कवच दिले.

# परा म्युझिक भारतात पहिली एआय म्युझिक कंपनी म्हणून लॉंच

## जिथे एआय स्वतःसंगीत तयार करत नाही

मुंबई (दै. संध्या) :

परा म्युझिकने आज भारतातील पहिली एआय-आधारित म्युझिक कंपनी म्हणून अधिकृतपणे आपल्या कार्याची सुरुवात जाहीर केली आहे. कंपनीचा उद्देश भारतीय संगीताला भारतात आणि जगभरात अधिक लोकांपर्यंत पोहोचवणे आहे. अपोलो ग्रोथ कॅपिटलच्या नेतृत्वाखालील अँजेल आणि संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या समूहाने या कंपनीत गुंतवणूक केली आहे. येथे गाणी कलाकार स्वतः तयार करतात, तर एआय फक्त बाजार समजून घेण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी वापरले जाते. हे एआय टूल संगीताचा कॅटलॉग तयार करणे, त्याचे वितरण करणे आणि उत्पन्नाशी संबंधित निर्णय घेण्यास मदत करते. परा म्युझिक पुढील चार वर्षांत हिंदी आणि विविध प्रादेशिक भाषांमध्ये चित्रपट आणि नॉन-फिल्म संगीत मिळून सुमारे 40,000 गाण्यांचा मोठा कॅटलॉग तयार करण्याची योजना आखत आहे.




भारत आधीच जगातील सर्वात मोठ्या संगीत बाजारांपैकी एक आहे आणि FICCI-EY मीडिया आणि एंटरटेनमेंट रिपोर्ट 2026 नुसार, 2028 पर्यंत हा बाजार सुमारे 7,500 कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे आणि दरवर्षी सुमारे 9% वाढ होण्याची शक्यता आहे. तरीही, लोकांना हवे असलेले संगीत आणि ते सहज मिळणे यामध्ये अजूनही मोठी तफावत आहे, विशेषतः प्रादेशिक आणि नॉन-फिल्म संगीताच्या बाबतीत ही समस्या अधिक दिसते. उद्योगातील अंदाजानुसार स्ट्रीमिंग आणि रेकॉर्डेड म्युझिक दोन्ही क्षेत्रांत वाढ होत आहे. हिंदी तसेच प्रादेशिक भाषांतील संगीत ऐकण्याचे प्रमाणही वाढत आहे. ही संधी ओळखून परा म्युझिक दुर्लक्षित मागणीसाठी मजबूत संगीत कॅटलॉग तयार करणे, त्याचे वितरण करणे आणि कमाईची चांगली व्यवस्था उभी करण्याचा प्रयत्न करत आहे.

“भारतामध्ये जगातील सर्वात समृद्ध आणि विविध प्रकारचे संगीत क्षेत्र आहे, पण त्याची पूर्ण क्षमता अजून वापरली गेलेली नाही. परा म्युझिक ही कंपनी टेक्नॉलॉजी, डेटा आणि म्युझिक आयपीमध्ये धोरणात्मक गुंतवणूक करून ही संधी पुढे नेण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे. जागतिक रेकॉर्डेड म्युझिक मार्केट 2035 पर्यंत 200 अब्ज डॉलरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे, आणि भारत या वाढीचा मोठा भाग बनेल, असा आमचा विश्वास आहे. म्युझिक, टेक्नॉलॉजी, कंटेंट आणि व्यवसाय क्षेत्रातील अनुभवी आणि उत्कृष्ट टीमच्या मदतीने आम्ही एक नवीन प्रकारची म्युझिक कंपनी उभी करत आहोत. आमचे उद्दिष्ट भारतातील सर्वात मूल्यवान म्युझिक आयपी व्यवसायांपैकी एक बनणे आहे आणि त्याच वेळी उत्तम भारतीय संगीत योग्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे आहे.” असे परा म्युझिकच्या संस्थापिका रश्ना पोचखानवाला यांनी सांगितले.

“जेव्हा मोठी बाजारपेठ, चांगले व्यवसाय मॉडेल आणि मजबूत नेतृत्व एकत्र येते, तेव्हा अशा संधी फार क्वचित मिळतात. भारतातील संगीत क्षेत्र वेगाने वाढत आहे आणि आम्हाला विश्वास आहे की म्युझिक आईपी हा पुढील दशकातील खूप महत्त्वाचा व्यवसाय असेल. रश्ना यांनी आधीही यशस्वी म्युझिक व्यवसाय उभे केले आहेतआणि मोठ्या प्रमाणात वाढ करण्याची त्यांची क्षमता सिद्ध केली आहे. परा म्युझिक या मोठ्या संधीचा राष्ट्रीय स्तरावर फायदा घेण्यासाठी योग्य स्थितीत आहे. एआय हे कंपनीच्या वाढीला आणि कमाईच्या मॉडेलला मदत करेल. भारतातील संगीत क्षेत्रात नवीन टप्पा सुरू होत असताना आम्ही खूप उत्साहित आहोत. आम्ही रश्ना यांच्या दृष्टीकोनाशी पूर्ण सहमत आहोत आणि कंपनीच्या वाढीसाठी मोठी गुंतवणूक करत आहोत.”

## कोविद खूब एससी प्रवर्गातून देशात पहिला

नागपूर (दै. संध्या) :

आयआयटी, एनआयटीसह देशातील इंजिनिअरिंगच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित पूर्व परीक्षा 'जेईई अॅडव्हान्स'चा निकाल सोमवारी जाहीर झाला. यात नागपूरच्या विद्यार्थ्याने अभिमानास्पद कामगिरी केली आहे. शहरातील कोविद खूब या विद्यार्थ्याने परीक्षेत अनुसूचित जाती प्रवर्गातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. कोविदला ३६० पैकी २७८ गुण असून ८२ वी ऑल इंडिया रैंक प्राप्त झाली आहे. परीक्षेत शहरातून माधव नोतानी या विद्यार्थ्याने 'कॉमन रैंक लिस्ट'मध्ये २५ वा क्रमांक घेत नागपुरातून टॉप केले आहे. त्याला ३६० पैकी ३०० गुण मिळाले आहेत. यासह कोविद खूब या विद्यार्थ्यांना ८२ वी ऑल इंडिया रैंक प्राप्त करीत यशस्वी झेप घेतली. तो अनुसूचित जाती प्रवर्गात देशात पहिला आहे. जेईई अॅडव्हान्स २०२६ साठी देशभरातून १ लाख ८७ हजार ३८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

## चाकणला भर चौकात झळकतोय भैरवनाथ यात्रेचा जमाखर्च

चाकण (दै. संध्या) :

श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ मंडळी चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे आयोजित करण्यात आलेली श्री भैरवनाथ महाराजांची यात्रा यावर्षी निर्विघ्नपणे पार पडली. या यात्रेचा जमाखर्चाचा ताळेबंद चाकण शहरात भर चौकांमध्ये झळकत असल्याने सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे. चाकणला यात्रेनिमित्त श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने प्रवचन, कीर्तन, हरीजागर, बैलगाडा शर्यती, सांस्कृतिक कार्यक्रम,




कुस्त्यांचा जंगी आखाडा आयोजित करण्यात आला होता. गावचे आराध्य दैवत असलेल्या भैरवनाथ मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मनोरंजनाचे कार्यक्रम, ऑर्केस्ट्रा, बैलगाडा शर्यती हे या यात्रेतील मुख्य आकर्षण ठरले. त्याचप्रमाणे कुस्ती शौकिनांसाठी कुस्त्यांचा जंगी आखाडा आयोजित करण्यात आला होता. बैलगाडा शर्यतीतील विजेत्या गाडा मालकांना व कुस्तीतील विजेत्या मल्लांना रोख पारितोषिके देण्यात आली. यात्रेचा संपूर्ण खर्च २४ लाख, ४३ हजार ३८४ रुपये इतका झाला आहे, एवढी इत्यंभूत माहिती चाकण मधील चौकांमध्ये झळकत आहे. लक्ष वेधून घेणाऱ्या या बॅनरमुळे संपूर्ण चाकणकर ग्रामस्थांच्या भुवया उंचावल्या असून, यात्रा कमिटीचे कौतुक होत आहे.

> “चाकण मध्ये यावर्षी यात्रेचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. पोलीस प्रशासनाचे विशेष सहकार्य लाभल्याने यात्रा निर्विघ्नपणे पार पडली. ग्रामस्थांना यात्रेचा जमा खर्च माहिती असावा, यासाठी चाकण मध्ये भर चौकात जमाखर्चाचा बॅनर लावण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या काही सूचना असतील तर त्यांनी महिन्यातील शेवटच्या रविवारी ग्रामदैवत भैरवनाथ मंदिरामध्ये लेखी स्वरूपात कळवाव्यात.”
>
> **- किसन गोरे, अध्यक्ष, भैरवनाथ यात्रा कमिटी, चाकण.**

## मीशोने भारतीय एमएसएमईंना एसएमई आयपीओंसाठी तयार करण्याकरिता बीएसईसोबत केली भागीदारी

पुणे (दै. संध्या) : वार्षिक व्यवहार करणारे ग्राहक आणि ऑर्डर्सच्या संख्येच्या बाबतीत भारतातील सर्वात मोठे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म असलेल्या 'मीशो'ने बीएसईच्या भागीदारीत ‘प्रोजेक्ट शिखर’ सुरू करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत, एमएसएमई ना बीएसईच्या एसएमई प्लॅटफॉर्मवर सार्वजनिकरीत्या सूचीबद्ध होण्यासाठी मदत केली जाईल; ज्यामुळे त्यांना त्यांच्या विकासासाठी आवश्यक भांडवल उभारणे शक्य होईल. ही भागीदारी सामंजस्य करार (एमओयू) मीशोच्या कॉर्पोरेट व्यवहार प्रमुख, श्रीमती लोपामुद्रा राव आणि बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सुंदररामन राममूर्ती यांच्या




उपस्थितीत स्वाक्षरित करण्यात आला. डिजिटल व्यवसायांना संस्थात्मक भांडवल उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. बीएसई चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सुंदररामन राममूर्ती यांनी सांगितले, “बीएसई मध्ये, आम्ही भारताच्या सर्वात प्रमुख आणि रोजगारनिर्मिती करणाऱ्या व्यवसायांना भांडवली बाजारात प्रवेश उपलब्ध करून देण्यासाठी एसएमई प्लॅटफॉर्म' सुरू केला आहे. गेल्या काही वर्षांत, भांडवल उभारणी करण्यासाठी आणि त्यांचे प्रशासकीय मानके उंचावण्यासाठी शेकडो एमएसएमई ने बीएसईच्या एसएमई प्लॅटफॉर्मवर स्वतःची लिस्टिंग केली आहे. मीशो सोबतची ही भागीदारी 'डिजिटल-फर्स्ट' उद्योजक आणि ई-कॉमर्स विक्रेत्यांना सार्वजनिक कंपन्या बनण्यास मदत करेल.” मीशोच्या कॉर्पोरेट अफेअर्स विभागाच्या प्रमुख, लोपामुद्रा राव म्हणाल्या, "आमच्या विक्रेता परिसंस्थेमध्ये मोठ्या संख्येने असे उद्योजक व्यवसाय आहेत ज्यांनी आमच्या प्लॅटफॉर्मवर झपाट्याने वाढ अनुभवली आहे. एका यशस्वी ई-कॉमर्स ब्रँडचे गुंतवणुकीसाठी तयार असलेल्या संस्थेमध्ये रूपांतर करणे हे एक आव्हानात्मक काम आहे; तथापि, प्रोजेक्ट शिखरने ही प्रक्रिया लक्षणीयरीत्या सोपी केली आहे. बीएसईसोबतच्या आमच्या भागीदारीद्वारे, आम्ही केवळ विक्रेत्यांना सार्वजनिक भांडवल मिळवण्यास सक्षम करत नाही, तर नियमांचे पालन करणाऱ्या आणि पारदर्शक व्यवसायांची एक साखळी देखील तयार करत आहोत, जी भारताच्या अर्थव्यवस्थेच्या औपचारिकी करणाला गती देईल."

**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सुचना**

अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदारांकडून सासवड विभागांतर्गत भोर उपविभागातील टीओडी मिटरचे (पीसी-0) रिडींग घेण्यासाठी नामांकित नोंदणीकृत अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा क्र. अनुक्रमे **EE/SWD/T-04/2026-27 रक्कम रु.0७.00** लाख मागविणेसाठी कोरे निविदा संच महावितरणच्या **https://etender.mahadiscom.in/eTender/eTender** या संकेत स्थळावर दि.0३.0६.२0२६ ते १0.0६.२0२६ पर्यंत डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील.

सदर निविदेचे शुल्क (ई-निविदा क्र.EE/SWD/T-04/2026-27), **रक्कम रु.११८०/-** फक्त ऑनलाईन पद्धतीनेच भरणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरी काराने राखुन ठेवला आहे.

**(पीआरओ/BMTZ/३८/२०२६-२७)**

**कार्यकारी अभियंता, महावितरण, सासवड विभाग.**

## दोन महिलांसह चौघांना बेड्या!

अमरावती (दै. संध्या) : नोकरीच्या शोधात असलेल्या एका १८ वर्षीय तरुणीला डांबून ठेवून तिच्यावर सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना महादेव खोरी परिसरात घडली आहे. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी दोन महिलांसह चार आरोपींना तातडीने अटक केली आहे. पीडित तरुणी नोकरी शोधत असताना तिची सायमा (२६) आणि रितू (२५) या महिलांशी ओळख झाली होती. १ जून रोजी रात्री रितूने पीडितेला चायनीज खाण्याच्या बहाण्याने बाहेर नेले. तिथे सायमाने पीडितेला चाकूचा धाक दाखवत, जीवे मारण्याची धमकी देऊन जबरदस्तीने महादेव खोरी येथील एका घरात डांबले. त्यानंतर तिथे हजर असलेल्या गोलू (२६) आणि करण (२७) या नराधमांनी रात्रभर पीडितेवर अत्याचार केला.

## ‘मास्टरप्लॅन’!

अमरावती (दै. संध्या) : आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर नगरीत देशभरातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या स्वागतासाठी मध्य रेल्वे सज्ज होत आहे. कुंभमेळ्यादरम्यान होणारी प्रवाशांची प्रचंड गर्दी लक्षात घेऊन भुसावळ रेल्वे विभागाने देवळाली, नाशिक रोड, ओढा, खेरवाडी आणि कसबे सुकणे या पाच महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर रेल्वे पायाभूत सुविधा विकासाची महाकाय कामे युद्धपातळीवर हाती घेतली आहेत. प्रवासी हाताळणी क्षमता वाढवणे, गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन करणे आणि रेल्वे गाड्यांचे संचालन अधिक गतिमान करणे हा या कामांचा मुख्य उद्देश आहे.

**मे. ए. एम. हुसेन कोर्ट, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, जुन्नर, जि. पुणे.**

दि. कि. अ.नं. ५६/२०२६
निशाणी- ०७

अर्जदार :- स्वप्नील रघुनाथ भोर, मौजे हिवरे बु., ता. जुन्नर, जि. पुणे.

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी इंडियन सक्सेन ॲक्ट ३७२ प्रमाणे या कोर्टाकडे मयत कै. रघुनाथ गिरजाभाऊ भोर मृत्यू दि. १४/०५/२०२५ यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासंबंधीचा अर्ज केलेला आहे.

वर्णन :- कै. रघुनाथ गिरजाभाऊ भोर यांची बॅंकेत असलेली रक्कम

१) पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. पुणे शाखा नारायणगाव येथील बचत खाते क. ०१७००१७०००१६१६५, बचत खाते क. ०१७००१७०००१६०४४ अशी खाती आहेत. त्यापैकी बचत खाते क्र. ०१७००१७०००१६१६५ मध्ये रक्कम रुपये १३,५७,७४०/- व बचत खाते क. ०१७००१७०००१६०४४ मध्ये रक्कम रुपये ४,८४,७९९.५७/- अशी एकुण रक्कम रुपये १८,४२,५३९.५७/- आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यानी दि. १०/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता स्वतः किंवा वकीलामार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दि. १३/०५/२०२६ सही व शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

हुकूमान्वये,
सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर जुन्नर

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस खासकरून गाव बारव ता. जुन्नर जि. पुणे येथील लोकास आमचे अशिलांनी सांगितलेवरून व दिलेल्या माहीतीवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद मिळकती या श्रीमती वैशाली रमाकांत ढोले रा. येणेरे ता. जुन्नर जि. पुणे यांचे एकमेव मालकीच्या असून श्रीमती वैशाली रमाकांत ढोले यांनी परिशिष्टात नमूद मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबतची खात्री देवून आमचे अशिलास विकणेबाबत व्यवहार ठरविला आहे. तेव्हा कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेचा सदर परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये वारसा, गहाण, देणगी, लीज, चार्ज, लायसेन्स, पोटगी, इजमेंट, विक्री अगर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आमचे खाली नमूद पत्यावरील कार्यालयात हि नोटीस प्रसिध्द झाले तारखोपासून ७ दिवसाचे आत आपले कागदपत्रासह आम्हास माहिती दयावी व पोहोच घ्यावी.

तसे न केल्यास सदर मुदतीनंतर आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व हक्कसंबंध विरहीत आहे व त्यावर कोणाचाही काही बोजा हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

**परिशीष्ट**

तु. पुणे पोट तुकडी ता. जुन्नर गाव बारव येथील बीनशेतजमिन मिळकती यांसी

| सर्वे. नं. | क्षेत्र चौ. मीटर | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ४/६७ | २७२.६८ | ३१६ रू. ०० पै |

येणेप्रमाणे बीन शेतजमिन मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूसह व कोणताही हक्क राखीव न ठेवता मिळकत

येणेप्रमाणे जाहीर नोटीस
ॲड. श्री. अनिरूध्द श्रीकृष्ण जोगळेकर
९६ कल्याणपेठ मु. पो. ता. जुन्नर जि. पुणे

**महानिर्मिती** — महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**इ-निविदा सूचना**
**क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/०८**

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००६९११८ / सिव्हिल | संच क्र. ४ ओव्हरहॉल दरम्यान थंड पाण्याच्या चॅनल सिस्टीम मधील पाण्याची गळती थांबवणे, तसेच तपासणी, स्वच्छता आणि वॉटरप्रूफिंग करणे. | ६,९९,६७८/- / १०,५००/- |
| २. | ३००००६८९३६ / बीएम | संच क्र. ४ ओव्हरहॉल दरम्यान बीएम विभागातील सामग्रीच्या अंर्तगत वाहतुकीसाठी ड्रायव्हर आणि मनुष्यबळासह हायड्रा क्रेन आणि ट्रक सेवा भाडयाने घेणे. | ४,८७,४२०/- / ८,३८०/- |
| ३. | ३००००६९२२३ / ईएम | संच क्र. ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान ६.६ केव्ही ब्रेकर्स (MOCB/VCB) साठी कामाचा करार. | २,१६,४१६/- / ५,७००/- |
| ४. | ३००००६९२२५ / ईएम | संच क्र. ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान एच.टी. मोटर ओव्हरहॉलिंग च्या कामाचे कंत्राट. | ९,९७,४७४/- / १३,५००/- |
| ५. | ३००००६९२२६ / ईएम | संच क्र. ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान एच.टी. मोटर्स शिफ्टिंगसाठी कामाचा करार | ५,७८,७६८/- / ९,३००/- |
| ६. | ३००००६९२२७ / ईएम | संच क्र. ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान ईएम आणि ओडीपी क्षेत्रातील स्थलांतरित होणा-या एलटी मोटर्ससाठी कामाचा करार. | २,७२,७५१/- / ६,२५०/- |
| ७. | ३००००६९२२८ / ईएम | संच क्र.४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान एलटी बोर्ड/ ब्रेकरच्या सर्व्हिसिंगसाठी कामाचा करार. | ४,३७,५१८/- / ७,९००/- |
| ८. | ३००००६९२२९ / ईएम | संच क्र.४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान ईएसपीच्या कामासाठी कंत्राट | ५,५०,३३१/- / ९,०५०/- |
| ९. | ३००००६९२३१ / ईएम | संच क्र.४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान विविध कामांच्या सहाय्यासाठी कामाचा करार. | ३,९८,९४८/- / ७,५००/- |
| १०. | ३००००६९२३८ / सिव्हिल | एकलहरे येथिल गोदावरी नदीच्या बंधा-याच्या दरवाजे व पंपांची देखभाल व संचालनासाठी द्विवार्षिक करार. | ३३,१७,५३२/- / ३६,७००/- |
| ११. | ३००००६९२४१ / ईएम | संच ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान वेल्डिंग नेटवर्क देखभाल करण्यासाठी कामाचे कंत्राट | १,७५,८३१/- / ५,३००/- |
| १२. | ३००००६९२५० / ओएस | जनरेटर ILI मधुन तेल काढून ते स्वच्छ करून संच क्र. ५ येथील COP मध्ये शिफ्ट करण्याचे काम. | १०,४७,५३२/- / १३,९८०/- |
| १३. | ३००००६९२५१ / बीएम | संच क्र. ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान कोल मिलच्या पिए डक्ट मधिल हॉट एअर/ कोल्ड एअर डॅम्पर, हॉट एअर/ कोल्ड एअर गेटस्ची सर्व्हिसिंग/ दुरुस्तीच्या कामाचा कंत्राट | २,७२,६११/- / ६,२३०/- |
| १४. | ३००००६९२५३ / सीएचपी | सीएचपी येथे बुलडोझरची (इंजिन वगळता) संपुर्ण टर्नकी देखभालीसाठी कामाचा करार. | १८८,५१,९८१/- / १,९२,०२०/- |
| १५. | ३००००६९२३२ / सिव्हिल | कॉलनीतील दैनंदिन प्लंबिंग कामासाठी वार्षिक करार. | १६,३१,६४६/- / १९,९००/- |

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः गांव शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा खरेदीचा व्यवहार हा आमचे आशिलांनी जब्बारखान नुरखान इनामदार, गफारखान नुरखान इनामदार, अय्याजखान नुरखान इनामदार, अकबरीबानो फैय्याजखान इनामदार, शहनाज नासीर इनामदार, समीरखान फैय्याजखान इनामदार, जमीरखान फैय्याजखान इनामदार, गुलनाज असीफ शेख व समरखान फैय्याजखान इनामदार यांचेसोबत केलेला आहे. सदर मिळकतीचे संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाटपाचा, अग्रहक्काचा, गहाणखताचा अगर इतर कोणत्याही प्रकारचा दावा न्यायप्रलंबीत नाही अशी खात्रीलायकरित्या माहिती वरील सर्व इसमांनी आमचे आशिलांना दिलेली आहे. तसेच खाली परिशिष्टात नमूद केलेली मिळकत निर्वेध व निजोखमी असलेबाबत खात्री व भरोसा वरील सर्व इसमांनी आमचे आशिलांस दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाचा कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध व दान, गहाण, पोटगी, मृत्युपत्र, खरेदी, विक्री, साठेखत, बक्षीसपत्र, सावकारी कर्ज, बँकेचे कर्ज, सहकारी पतसंस्था, बँकांचे कर्ज अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास अथवा वरील जब्बारखान नुरखान इनामदार, गफारखान नुरखान इनामदार, अय्याजखान नुरखान इनामदार, अकबरीबानो फैय्याजखान इनामदार, शहनाज नासीर इनामदार, समीरखान फैय्याजखान इनामदार, जमीरखान फैय्याजखान इनामदार, गुलनाज असीफ शेख व समरखान फैय्याजखान इनामदार हे सर्व इसम हे मुस्लीम धर्मिय असल्याने खालील परिशिष्टात नमूद मिळकतीत मुस्लीम कायद्यातील शुफा कायद्याप्रमाणे शफी-ए-जर, शफी-ए-खलीत, शफी-ए-शरीक या पध्दतीचे अग्रहक्काचे अधिकार असल्यास, अग्रहक्काने खरेदीची मागणी कोणीही केलेली असल्यास अगर कोणाचे याबाबत हक्क अगर अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून पाच दिवसांचे आत आमचे आशिल अथवा खालील नमूद पत्त्यावर कागदपत्रानिशी त्याविषयी खात्री करुन आमचे आशिलांना लेखी कळवावे.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आमचे आशिल हे सदरील नोटीस प्रसिध्द करीत आहे.

**: परिशिष्ट :**

मिळकतीचे वर्णन :- तुकडी व जिल्हा पुणे, पो. तु. ता. जुन्नर, मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे हद्दीतील व जुन्नर नगर परिषद जुन्नर यांचे हद्दीतील गाव शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सिटी सर्वे मिळकत.

| सि.स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|
| १८८५ | ३६४.४६ |

**यांसी चतुःसिमा :**

| | | |
|---|---|---|
| पुर्व | : | रस्ता व सि.स.नं. १८८४. |
| दक्षिण | : | सि.स.नं. १८८३ |
| पश्चिम | : | सि.स.नं. १८८१ |
| उत्तर | : | सि.स.नं. १८८६ |

यापैकी आमचे आशिल जब्बारखान नुरखान इनामदार, गफारखान नुरखान इनामदार, अय्याजखान नुरखान इनामदार, अकबरीबानो फैय्याजखान इनामदार, शहनाज नासीर इनामदार, समीरखान फैय्याजखान इनामदार, जमीरखान फैय्याजखान इनामदार, गुलनाज असीफ शेख व समरखान फैय्याजखान इनामदार यांचेकडून खरेदी घेत असलेले पुर्वेकडील क्षेत्र २७८.८१ चौ.मी.

**यांसी चतु सिमा :-**

| | | |
|---|---|---|
| पुर्व | : | रस्ता व सि.स.नं. १८८४. |
| दक्षिण | : | सि.स.नं. १८८३ |
| पश्चिम | : | सि.स.नं. १८८५ पैकी उर्वरीत क्षेत्र |
| उत्तर | : | सि.स.नं. १८८६ |


येणे प्रमाणे वर्णनाची चतुः सिमापुर्वक बखळ सिटी सर्वे मिळकत त्यातील दगड, विट, माती, जल, तृण, काष्ट, पाषाण, झाडेझुडपे, तदंगभूत वस्तूसह तसेच जाणे-येणेचे वहिवाटीचे हक्कासह दरोबस्त मिळकत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
जुन्नर,
दि. ०२/०६/२०२६

सही/-
श्री. समकित सुनिल नानावटी
ॲडव्होकेट
जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२.
मोबा. ९८५०५०६३२१

# ढासळलेली कायदा व सुव्यवस्था पाहता पोलिस आयुक्तांची उचलबांगडी करा

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड शहर हे महाराष्ट्रातील एक प्रगत औद्योगिक, शैक्षणिक व रोजगाराचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाते. परंतु गेल्या काही काळात शहरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे या शहराची प्रतिमा दिवसेंदिवस मलिन होत चालली आहे. नागरिकांमध्ये भीती, असुरक्षितता आणि पोलीस प्रशासनाविषयी अविश्वास निर्माण झाला आहे, त्यामुळे पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांची तात्काळ उचलबांगडी करावी,अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ( शरद पवार गट) कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात अलीकडील काळात घडलेल्या गंभीर घटनांनी कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे स्पष्ट केले आहे. विषारी दारू प्रकरणामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. महिलांवरील अत्याचार, विनयभंग व कामावर जाणाऱ्या महिलांवरील छेडछाडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. देहूरोड परिसरातील खूनाची घटना, राजकीय नेत्याची निर्घृण हत्या, टोळीगिरी, खंडणी, मादक पदार्थांची विक्री, गोळीबार यांसारख्या गंभीर घटनांनी नागरिकांच्या मनात भीती निर्माण केली आहे.

तसेच चिंचवड परिसरातील खासगी वाहनांची सर्रास तोडफोड, भररस्त्यात वाहनांवर हल्ले, संत तुकाराम नगर येथे लाकडी दांडक्यांनी वाहनांची तोडफोड करण्याच्या घटना उघडपणे घडत आहेत. गुन्हेगारांना कायद्याचा कोणताही धाक उरलेला नसल्याचे या घटनांमधून स्पष्ट दिसून येते.

याशिवाय पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक प्रमुख व रहदारीच्या रस्त्यांवर संध्याकाळच्या वेळेत खुलेआम तृतीयपंथीय व महिलांकडून सुरू असलेला देहविक्रीचा व्यवसाय हा देखील चिंतेचा विषय बनला आहे. अशा प्रकारच्या बेकायदेशीर व सामाजिकदृष्ट्या घातक प्रकारांमुळे शहराची प्रतिमा मलिन होत असून नागरिक, महिला, विद्यार्थी व कुटुंबांना मोठ्या प्रमाणात गैरसोयी व असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. पिंपरी-चिंचवड शहर व परिसरात अवैध गुटखा विक्री, मटका, लॉटरी, विविध बेकायदेशीर व्यवसाय आणि इतर अवैध धंदे मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अशा प्रकारच्या गुन्हेगारी व बेकायदेशीर कारवायांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात पोलीस यंत्रणा अपयशी ठरत असल्याची जनमानसात भावना आहे.

विशेष बाब म्हणजे, यापूर्वीच्या पोलीस आयुक्तांच्या कार्यकाळात शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीचे वातावरण निर्माण झाले नव्हते. पिंपरी-चिंचवड शहराने यापूर्वी अशी भयावह परिस्थिती अनुभवली नव्हती. मात्र सध्याच्या काळात शहराची वाटचाल चुकीच्या दिशेने होत असल्याचे दिसून येत आहे.

सध्याच्या पोलीस आयुक्तांनी रात्री १० नंतर विविध निर्बंध लागू करण्याचा निर्णय घेतला असला, तरी हा निर्णय गुन्हेगारी रोखण्यासाठी प्रभावी ठरलेला नाही. उलट सामान्य नागरिक, नोकरी करणारे कर्मचारी, व्यावसायिक, विद्यार्थी, महिला व रात्री प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याऐवजी सामान्य जनतेवर निर्बंध लादले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे.

आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, शहरातील नागरिकांमध्ये "कायद्याचे राज्य आहे की गुन्हेगारांचे?" असा प्रश्न निर्माण झाला आहे. गुन्हेगार उघडपणे कायद्याचे उल्लंघन करत आहेत आणि त्यांना कोणतीही भीती उरलेली दिसत नाही.

पिंपरी-चिंचवड हे एकेकाळी सुरक्षित, शिस्तबद्ध आणि प्रगत शहर म्हणून ओळखले जात होते. परंतु आज वाढती गुन्हेगारी, महिलांवरील अत्याचार, खून, खासगी वाहनांची सर्रास तोडफोड, अवैध धंदे, खुलेआम सुरू असलेला देहविक्रीचा व्यवसाय आणि संघटित गुन्हेगारी यांमुळे शहराची प्रतिमा राज्यभर खराब होत आहे. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून यासाठी संबंधित पोलीस प्रशासनाची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील सध्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन विद्यमान पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांची तात्काळ उचलबांगडी करून त्यांच्या जागी सक्षम, कर्तव्यदक्ष, कठोर व जनहिताला प्राधान्य देणाऱ्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी हि मागणी देवेंद्र तायडे यांनी केली आहे.

- पिंपरी-चिंचवड शहरातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी.
- शहरातील वाढत्या गुन्हेगारीस कारणीभूत ठरत असलेल्या प्रशासकीय त्रुटींची चौकशी करण्यात यावी.विषारी दारू प्रकरण, खून, महिलांवरील अत्याचार, खासगी वाहनांची तोडफोड, देहविक्री, संघटित गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांबाबत विशेष तपास पथक नियुक्त करण्यात यावे.
- देहूरोड, चिंचवड, संत तुकाराम नगर, पिंपरी, निगडी, भोसरी तसेच इतर संवेदनशील भागांमध्ये विशेष गुन्हेगारीविरोधी मोहीम राबविण्यात यावी.
- अवैध गुटखा, मटका, लॉटरी, मादक पदार्थांचे जाळे व इतर बेकायदेशीर व्यवसायांवर कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्यात यावी.
- नागरिकांच्या सुरक्षेसाठी परिणामकारक उपाययोजना राबवून पोलीस यंत्रणेवरील जनतेचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यात यावा.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बेकायदेशीर दारू व्यवसायिकांना मोठा दणका; 29 जणांवर गुन्हे दाखल


पिंपरी (दैनिक संध्या) : फुगेवाडी-दापोडी येथील विषारी दारू प्रकरणानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी बेकायदेशीर दारू व्यवसायाविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, एकाच दिवसात तब्बल २३ धडक कारवाया करत ११ महिलांसह २९ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. शहरातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या किरकोळ दारू विक्री, अवैध दारू निर्मिती आणि ताडी विक्रीच्या अड्ड्यांवर पोलिसांनी एकाचवेळी छापेमारी केली. पिंपरी, एमआयडीसी भोसरी, आळंदी, तळेगाव एमआयडीसी, देहूरोड, चाकण, म्हाळुंगे, चिंचवड, रावेत, हिंजवडी आणि सांगवी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही व्यापक मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत अवैध दारू विक्रीच्या २० प्रकरणांमध्ये सुमारे ७०० लिटर दारू जप्त करण्यात आली. तसेच एमआयडीसी भोसरी पोलिसांनी महात्मा फुले नगर परिसरातील एका सलूनच्या आडोशाने सुरू असलेल्या ताडी विक्री केंद्रावर छापा टाकून १०० लिटर ताडी जप्त केली. दरम्यान, दक्षिण चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोयाळी आणि नाणेकरवाडी येथे सुरू असलेल्या दोन अवैध दारूभट्ट्यांवरही पोलिसांनी कारवाई केली. या ठिकाणी दारू निर्मितीसाठी भिजत ठेवलेले सुमारे २२०० लिटर रसायन नष्ट करण्यात आले. विषारी दारू प्रकरणानंतर पोलिसांनी बेकायदेशीर दारू व्यवसायाविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारल्याचे दिसून येत आहे. अवैध दारूची निर्मिती, विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरोधातील ही मोहीम आगामी काळात आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



### सोमेश्वर ज्येष्ठ नागरिक संघाचा स्वर यात्रा कार्यक्रम संपन्न

पिंपरी (दैनिक संध्या) : सोमेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ आदर्श नगर, किवळे -रावेत संघाचा मे महिन्यातील सभासद अभिष्टचिंतन साजरा करण्यात आला. यात संघाच्या 36 सभासदांना शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सोमेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ प्रस्तुत जुन्या- नव्या मराठी, हिंदी गीतांची कराओके मैफिल "स्वर यात्रा" या कार्यक्रमाचे उद्घाटन नगरसेवक निलेश तरस यांच्या हस्ते करण्यात आले. स्वर यात्रा कार्यक्रमात रोहिदास पिलाने, शिवकांत जैस्वाल, सुमंगेश कुलकर्णी, भीमाशंकर जाधव, बाळासाहेब जगदाळे, बाळासाहेब क्षीरसागर, मुरलीधर भोलणकर, स्नेहा मुळे, प्रेरणा पाटील, विजय उपासनी या गायक कलाकारांनी विविध मराठी, हिंदी भावगीत, भक्तीगीत, लोकगीत, फिल्मी गीत सादर केले. त्यास उपस्थित रसिक प्रेक्षकांनी प्रत्येक गीताच्या सादरीकरणानंतर टाळ्यांचा कडकडाट तर काही गीतांना वन्स मोअर ने दाद दिली. "स्वर यात्रा" कार्यक्रमाची निर्मिती सोमेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ संचालक मंडळ, संकल्पना -रोहिदास पिलाने यांची तर निवेदन सुरेश बडगुजर यांनी केले. संगीत संयोजक होते सुहास माणगावकर तर प्रायोजक निलेश तरस होते. यावेळी संघाचे अध्यक्ष -सुदाम दिवटे, उपाध्यक्ष- साहेबराव पाटील, सचिव -सुरेश बडगुजर, खजिनदार- प्रकाश सावंत, सहसचिव- तुकाराम कोरडे, सह खजिनदार- किशोर गायकवाड, संचालक -धोंडीराम पाटील, राजेंद्र मोरे यांच्या नियोजनबद्ध संयोजनामुळे कार्यक्रम उत्तमरीत्या संपन्न झाला. कार्यक्रम बहारदार झाल्याचा अभिप्राय प्रेक्षकांच्या चर्चेतून मिळाला.

### 36 लाखांच्या बीअर टँक चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा; विश्वासू कामगारासह 6 जण जेरबंद



पिंपरी (दैनिक संध्या) : म्हाळुंगे सावरदरी येथील नव्याने उभारण्यात येत असलेल्या 'टाईने रिबेल' या बीअर उत्पादन कंपनीमधून तब्बल ३६ लाख रुपये किमतीचे १० बीअर स्टोअरेज टँक चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली होती. या गुन्ह्याचा छडा लावत उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे. विशेष म्हणजे कंपनीच्या एका विश्वासू माजी कामगारानेच हा चोरीचा कट रचल्याचे तपासात समोर आले आहे. फिर्यादी विवेक खैरे यांना सुमारे ४० दिवसांनंतर या चोरीची माहिती मिळाल्याने तपासासाठी पोलिसांकडे कोणताही ठोस धागादोरा नव्हता. मात्र पोलिसांनी हार न मानता परिसरातील ३० ते ३५ कंपन्यांचे तब्बल ६०० जीबीपेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. या तपासादरम्यान संशयित क्रेन आणि ट्रकची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले.

## रोहीदास कोंडे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्यावतीने पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट संघटनेचे संस्थापक कार्याध्यक्ष व माजी अतिरिक्त आयुक्त रोहीदास कोंडे यांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला. रोहीदास कोंडे यांच्यासारखे प्रशासक उत्कृष्ट क्रिडापटू निर्माण करू शकतो आणि समाजाच्या उत्कर्षामध्ये भरीव योगदान देऊ शकतात आणि आदर्श निर्माण करू शकतात, असे गौरवोद्गार मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी काढले.

असोसिएशन तर्फे आयोजित हा कार्यक्रम नुकताच पार पडला. यावेळी महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे माजी सचिव रियाझ बागवान, अध्यक्ष जगदीश शेट्टी, सचिव राजू कोतवाल, सहसचिव डॉ. दिलीपसिंह मोहीत, खजिनदार संजय शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते. मानपत्र, पुणेरी पगडी, श्री गणेशाची मुर्ती, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी बोलताना खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहरात क्रीडा संस्कृती रूजविण्याचे चांगले काम कोंडे साहेबांनी केले. तसेच शिस्तबध्द व उत्तम प्रशासक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. शहरातील खेळाडूंना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध होती, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. याशिवाय पिंपरी चिंचवड शहरात क्रिकेट असोसिएशन याव्दारे क्रिकेटमध्ये सर्व स्तरावरच्या गुणवान खेळाडूंना संधी मिळण्याचे प्रयत्न कोंडे साहेबांनी केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मुदूला महाजन यांनी केले. मानपत्राचे वाचन संजय शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक असोसिएशनचे सचिव राजू कोतवाल यांनी केले. आभार डॉ. दिलीपसिंह मोहीते यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरूण जागडे, आनंद नायडू मुकेश गुजराती, अविनाश देव, एन. डी. कदम, ऐश्वर्या साठे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## मृतदेह आढळला

पिंपरी (दै. संध्या) : मावळ तालुक्यातील बेबडोहळ येथील पवनानदी पुलाखाली एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच शिरगाव परंदवाडी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा आणि पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. स्थानिक नागरिकांनी पुलाखाली मृतदेह आढळल्याची माहिती पोलिसांना दिली. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून मृत्यूचे नेमके कारण समोर आलेले नाही. मात्र, मृतदेह ज्या परिस्थितीत आढळून आला आहे, त्यावरून नागरिकांकडून खुनाची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे.

## हातभट्टी दारूने बळी जाणे म्हणजे सरकारपुरस्कृत खून

पिंपरी (दै. संध्या)

■ दोषी पोलीस व अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याची आपची मागणी

पिंपरी चिंचवड शहरात अवैध हातभट्टी दारू सेवनाने निष्पाप नागरिकांचे मृत्यू होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आशीर्वादानेच हा अवैध धंदा राजरोसपणे सुरू असल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टी, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट यांनी केला आहे.

या हत्याकांडाच्या निषेधार्थ आपचे शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट, आप प्रवक्ते प्रकाश हगवणे, युवा आघाडी अध्यक्ष, विकी पासोटे, क्रीडा आघाडी अध्यक्ष विजय चंडाल, ओबीसी आघाडी राहुल मदने, सुरेश बावनकर,अंगद मुगळे, अंकुश डोंगरे, राजकुमार अडोळे, प्रशांत कांबळे, यांनी आज पोलीस आयुक्तांना निवेदन देऊन 10 प्रमुख मागण्या केल्या आहेत.

"7 दिवसात ठोस कारवाई न झाल्यास आम आदमी पार्टी पोलीस आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करेल व उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करेल," असे आपचे शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, "हातभट्टीचे बळी म्हणजे अपघात नाही, तर सरकारपुरस्कृत खून आहेत. जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या खाकी वर्दीतील दलालांना बडतर्फ केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही."

## सोसायटींमधील ओला कचरा संकलनाचा मुद्दा पेटणार

पिंपरी (दै. संध्या)

■ पालिकेच्या नव्या निममावलीला फेडरेशनचा तीव्र विरोध

पिंपरी-चिंचवड महापालिकेने घेतलेल्या नव्या निर्णयानुसार १ जुलै २०२६ पासून दररोज १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्या, मंगल कार्यालये, वसतिगृहे, कंपन्या, कँटीन व इतर आस्थापनांचा ओला कचरा महापालिका गोळा करणार नाही. संबंधित आस्थापनांनी आपल्या आवारातच कंपोस्टिंग किंवा बायोमिथनायझेशन प्रकल्प उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार ही अंमलबजावणी केली जात असल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाने स्पष्ट केले असून, ३० जूनपर्यंत सोसायट्यांना स्वतःच्या स्तरावर कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची मुदत देण्यात आली आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर दंडात्मक तसेच फौजदारी कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात ५ हजार आणि दुसऱ्या टप्प्यात १५ हजार रुपये दंड, तसेच सातत्याने नियमभंग झाल्यास पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार जबाबदार व्यक्तींवर खटला दाखल केला जाऊ शकतो, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी फेडरेशनने या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## आरोपींना पाहताच संतापाचा उद्रेक

पिंपरी (दै. संध्या) : फुगेवाडी विषारी दारू प्रकरणातील आरोपींना घेऊन सीआयडीचे पथक घटनास्थळी दाखल होताच परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या प्रकरणात मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांसह स्थानिकांनी आरोपींविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

सीआयडीचे पथक पंचनामा आणि तपासासाठी आरोपींना फुगेवाडीत घेऊन आले होते. आरोपींना पाहताच मृतांच्या नातेवाईकांनी आणि नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली. यावेळी एका वृद्ध महिलेने चप्पल हातात घेऊन आरोपींसमोर उभे राहत आपला संताप व्यक्त केला. तर काही तरुणांनी सिमेंट ब्लॉक आणि दगड उचलून आरोपींकडे धाव घेण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन सीआयडी अधिकारी आणि पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला.

## अन्न व औषध प्रशासनाकडून ५ ठिकाणी धडक कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

■ १९ लाखाहून अधिक रकमेचा साठा जप्त



अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत आंबेगाव व खेड तालुक्यात ५ ठिकाणी धडक कारवाई करण्यात आली; यामध्ये १९ लाख ३ हजार ३७९ लाख रुपयाचा साठा जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती पुणे विभागाचे सहायक आयुक्त (अन्न) दि.वा. भोगावडे यांनी दिली आहे.

आंबेगाव तालुक्यात मंचर येथे साईराज पान अँड टी हाऊस व समीक्षा कोल्ड्रिक जनरल अँड किराणा स्टोअर यांच्या पाठीमागील छोट्या गोदामामध्ये दोन ठिकाणी ३० हजार ३९५ रुपयाचा गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री करत असल्याचे आढळून आले. संबंधितावर भारतीय न्याय संहिता, २०२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार पोलीस स्टेशन, मंचर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंचर येथे खेमराज फूड इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड ही आस्थापना विनापरवाना नोंदणी व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. तसेच येथे विक्रीसाठी ठेवण्यात आलेला मैदा, बेसन, आटा व इतर अन्नपदार्थ असा १९ हजार ८८६ किलोचा १० लाख ४९ हजार ३६४ रुपये किमतीचा साठा नमुना विश्लेषणासाठी घेऊन जप्त करण्यात आला.

खेड तालुक्यातील खालची भांबुरवाडी येथील उज्वल सुपारी ही आस्थापना विनापरवाना, नोंदणी व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. या आस्थापनेत विक्रीसाठी ठेवण्यात आलेली सुपारी ही अप्रमाणित अथवा असुरक्षित असल्याच्या संशयावरून १ हजार ८९८ किलो वजनाचा आणि ८ लाख १६ हजार १४० रुपयाचा साठा जप्त करण्यात आला.

# सोशल मीडियावरील जनगणनेच्या अफवांपासून सावध रहा

### आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी : जनगणना प्रक्रिया पूर्णत: डिजिटल आणि पारदर्शक; नागरिकांना अपप्रचाराला बळी न पडण्याचे आवाहन

पिंपरी (दै. संध्या)




पिंपरी चिंचवड शहरात सुरू असलेल्या 'जनगणना २०२७'च्या घरसूचीकरण व घरगणना सर्वेक्षणासंदर्भात सोशल मीडियावर दिशाभूल करणारे संदेश, अफवा आणि अप्रमाणित माहिती प्रसारित होत असल्याने नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया ही अधिकृत, पारदर्शक आणि पूर्णतः डिजिटल पद्धतीने राबविली जात असून, कोणत्याही खोट्या माहितीस बळी पडू नये, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे. सोशल मीडियावर जनगणना प्रक्रियेबाबत विविध प्रकारची अप्रमाणित माहिती आणि खोटी संकेतस्थळे प्रसारित होत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

महापालिकेने नियुक्त केलेल्या अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षक यांच्या माध्यमातूनच जनगणनेचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत कोणत्याही कागदी फॉर्मचा वापर न करता मोबाईलवरील अधिकृत 'एचएलओ ॲप 'द्वारे ऑनलाइन स्वरूपात माहिती नोंदविली जात असल्याचे शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले. महापालिकेच्या माहितीनुसार, 'जनगणना २०२७'च्या पहिल्या टप्प्यातील घरसूचीकरण व घरगणनेच्या प्रत्यक्ष कामास १६ मे २०२६ पासून सुरुवात झाली असून, ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. एचएलओ ॲपच्या माध्यमातून घरांचे सर्वेक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्यात येत असून, ही प्रक्रिया सुरक्षित, अचूक आणि पूर्णतः डिजिटल स्वरूपात राबविली जात असल्याचेही शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी नमूद केले. प्रशासनाने नागरिकांना खोट्या संकेतस्थळांपासून आणि सोशल मीडियावरील अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. अचूक जनगणना ही शहर विकासाची भक्कम पायाभरणी असून, शाळा, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते आणि इतर नागरी सेवांचे नियोजन अचूक माहितीच्या आधारेच प्रभावीपणे करता येते, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

जनगणना अधिकारी केवळ आवश्यक माहिती नोंदवतात. ते कोणतेही आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा इतर सरकारी कागदपत्र, बँक तपशील अथवा मोबाईल ओटीपी मागत नाहीत. नागरिकांनी दिलेली सर्व माहिती सुरक्षित आणि गोपनीय राखली जाते. त्यामुळे जनगणना कर्मचाऱ्यांना आवश्यक सहकार्य करून शहर विकासाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

> सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित माहिती, अफवा किंवा दिशाभूल करणाऱ्या संदेशांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी केवळ अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांनाच सहकार्य करावे. संपूर्ण जनगणना प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि डिजिटल स्वरूपात 'एचएलओ ॲप 'च्या माध्यमातून राबविली जात असून नागरिकांनी विश्वासाने आणि जबाबदारीने आपला सहभाग नोंदवावा."
>
> **— डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> जनगणना २०२७ अंतर्गत माहिती संकलनाचे काम 'एचएलओ ॲप 'च्या माध्यमातून अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षकांमार्फत पूर्णतः ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. नागरिकांनी सोशल मीडियावरील अफवा किंवा अपप्रचारावर विश्वास न ठेवता अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांनाच सहकार्य करावे. जनगणना अधिकारी कोणतेही कागदपत्र, बँक तपशील किंवा मोबाईल ओटीपी मागत नाहीत.
>
> **— सचिन पवार, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्व. गोविंद हिंगोरानी स्मृतिदिनानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिर

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी औद्योगिक वसाहतीतील प्रसिद्ध उद्योजक स्वर्गीय गोविंद हिंगोरानी यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त कंपनी व्यवस्थापन व कामगार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य उपक्रमास कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. हे शिबिर सुलोचना नेत्रालय लोणंद येथील डॉ. देवदत्त राऊत यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरित्या संपन्न झाले. शिबिरामध्ये कामगारांची नेत्र तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कंपनी व्यवस्थापन प्रमुख नयम शेख, शंतनु घाडगे, मनुष्यबळ विभागाचे अतुल बनकर, मोहन चौंडकर,अक्षय बारभाई, विजय भोसले, राजेश डोळस, संदीप थोपटे, किशोर कामथे, निळकंठ गाडेकर, कल्पेश मेमाणे, कैलास कामथे,निलेश पवार, मिलिंद यादव,प्रकाश कड आदी मान्यवर उपस्थित होते. स्वर्गीय गोविंद हिंगोरानी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे कामगार व परिसरातून कौतुक करण्यात आले.



### सरचिटणीसपदी नितीन जगनाडे यांची बिनविरोध निवड

आळंदी (दैनिक संध्या) : ऑल इंडीया डिफेन्स एम्प्लॉइज ई.एम. ई टेक्नीकल सुपरवायजर असोशियशन या संस्थेच्या सरचिटणीसपदी नितीन जगनाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष काळुराम पवार यांनी दिली.खजिनदार सतीश शेट्टी , संघटक रामचंद्र तातळे, विठ्ठल जाधव यांनी त्यांचे यावेळी अभिनंदन केले. नितीन जगनाडे यांनी या पुर्वी ५१२ आर्मी बेस वर्कशॉप खडकी मधील (एसीई) असोशीयशन ऑफ सिव्हिलीयन एम्प्लॉइज ऑफ आय.इ.एम.ई वर्कशॉप,खडकी या कामगार संरक्षण क्षेत्रातील कामगार संघटनेचे सरचीटणीस पदी काम केले होते,ते कार्य समितीचे उपाध्यक्ष होते,त्याच प्रमाणे वर्कशॉप मधील हॉस्पिटल एड फंडाचे,सचीव व चेअरमन व ५१२ क्रेडिट सोसायटी चे संचालकपदी काम केले असून सध्या ते वर्कशॉप मध्ये सुपरवायजर म्हणून कार्यरत आहेत. कामगार संघटनेचा प्रदिर्घ अनुभव, कुशल नेतृत्व व सर्वांना एकत्रित ठेवण्याचे संघटन कौशल्य पाहुन ऑल इंडीया डिफेन्स एम्प्लॉइज ई एम ई टेक्नीकल सुपरवायजर असोशियशन या संघटनेच्या सरचीटणीस पदी त्यांना संधी देत त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

### चारित्र्याच्या संशयातून 'लिव्ह-इन'मधील तरुणीचा खून



वाघोली (दैनिक संध्या) : चारित्र्याच्या संशयावरून एका २६ वर्षीय तरुणीचा तिच्यासमवेत 'लिव्ह-इन'मध्ये एकत्र राहणाऱ्या जोडीदाराने खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपीने तरुणीचा खून केल्यानंतर तो घराला बाहेरून कुलूप लावून पसार झाला. घरातून दुर्गंधी सुटल्यानंतर एक जून रोजी हा प्रकार उघडकीला आला. रिहाना खातून (वय २६, रा. शिवअस्मी बिल्डिंग, आव्हाळवाडी रस्ता, वाघोली) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे. ही तरुणी मूळची पश्चिम बंगालमधील मेदिनीपूर जिल्ह्यातील रहिवासी आहे. याप्रकरणी इम्रान राजेसाब बोदले खान (रा. आदर्शनगर, लोहगाव) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार वाघोली पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. रवी समीर वैराळ असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत रिहाना खातून आणि आरोपी रवी वैराळ हे दोघे वाघोलीतील आव्हाळवाडी रस्ता परिसरात एकत्र राहत होते. मात्र, काही महिन्यांपासून आरोपी रिहानाच्या चारित्र्यावर संशय घेत होता. या कारणावरून त्यांच्यात वारंवार वाद होत होते. २८ मे रोजी त्यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. रागाच्या भरात आरोपीने तिला बेदम मारहाण करून तिचा खून केला. गुन्हा लपवण्यासाठी आरोपीने तिचा मृतदेह घरातच ठेवून बाहेरून कुलूप ठोकून तो पसार झाला. घरातून दुर्गंधी येऊ लागल्याने इमारतीमधील रहिवाशांना संशय आला. रहिवाशांनी तातडीने स्थानिक पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बंद घराचे कुलूप तोडले. आत प्रवेश केला असता रिहानाचा मृतदेह आढळून आला. या घटनेनंतर परिमंडळ सातचे पोलिस उपायुक्त डॉ. प्रशांत अमृतकर, सहाय्यक आयुक्त नूतन पवार आणि वाघोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी घटनास्थळाला भेट दिली. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक (गुन्हे) विजय चंदन करत आहेत.


### कांदा प्रश्नावर केंद्र सकारात्मक; आंदोलकांनी चर्चेला यावे : दिलीप वळसे पाटील



मंचर (दैनिक संध्या) : राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत केंद्र व राज्य सरकार सकारात्मक असून, आंदोलकांनी आंदोलनाचा मार्ग सोडून चर्चेसाठी पुढे यावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेज्येष्ठ नेते व माजी गृहमंत्रीदिलीप वळसे पाटील यांनी केले. पुणे -नाशिक राष्ट्रीय महामार्गावरमंचर जवळ नंदी चौकात मंगळवारी (ता. २)कांदा प्रश्नावर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आमदार रोहित पवार , आमदार बाबाजी काळेयांच्या नेतृत्वाखालीझालेल्या रास्ता रोको आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. राज्यातील कांदा उत्पादकांना योग्य भाव मिळत नसल्याने त्यांच्यासमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस,आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेत वळसे पाटील यांनी आंदोलकांना जाहीर चर्चेचे खुले आमंत्रण दिले. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यास आपण तयार असल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलकांनी आपल्याकडे येऊन चर्चा करावी किंवा गरज भासल्यास आपण आंदोलनस्थळीही जाण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कांदा उत्पादक व साखर उद्योगाच्या प्रश्नांवर नुकतीच नवी दिल्ली येथे केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक झाल्याची माहिती वळसे पाटील यांनी दिली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्यातील वरिष्ठ मंत्र्यांनी कांदा प्रश्नाची तीव्रता केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून दिली. या संदर्भात पुढील दहा दिवसांत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन अमित शाह यांनी दिल्याचे त्यांनी सांगितले. कांदा उत्पादकांच्या मागण्यांसंदर्भात आपण लवकरच ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेणार असून, दिल्लीतील चर्चेची माहिती त्यांना देणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा यासाठी शरद पवार यांनीही पुढाकार घ्यावा, अशी विनंती आपण करणार असल्याचे ते म्हणाले.

# पालिका कर्मचाऱ्याचा सेवापुर्तीबद्दल गौरव

**सासवड (दै. संध्या)**



■ नगरपालिकेचे कर्मचारी दत्तात्रय यशवंत खोमणे यांच्या सेवानिवृत्तीबद्दल त्यांचा सत्कार करताना मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, राजनभय्या जगताप, माऊली गिरमे, बंडू राऊत व इतर ■

सासवड नगरपालिकेचे चतुर्थश्रेणी कर्मचारी दत्तात्रय यशवंत खोमणे हे पालिकेमध्ये तब्बल ३४ वर्षांची प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवा पूर्ण करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या या यशस्वी सेवापूर्तीबद्दल सासवड नगरपालिकेच्या वतीने त्यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात खोमणे यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि त्यांच्या सेवांतर्गत निधीचा धनादेश सुपूर्द करून सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. या निरोप समारंभाला नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, आरोग्य समितीचे सभापती राजनभय्या जगताप, पाणी पुरवठा समितीचे सभापती माऊली गिरमे, नगरसेवक प्रदीप उर्फ बंडू राऊत यांच्यासह सर्व विभागांचे खातेप्रमुख आणि बहुसंख्येने कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना साकेत जगताप, राजनभय्या जगताप व मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून दत्तात्रय खोमणे यांच्या कामाचे कौतुक केले आणि त्यांना पुढील भावी आयुष्यासाठी व निरोगी आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना पाणी पुरवठा सभापती माऊली गिरमे यांनी खोमणे यांच्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला.

खोमणे यांनी आपल्या ३४ वर्षांच्या कारकिर्दीत पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, जकात यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि जनसंपर्काच्या विविध विभागांमध्ये अतिशय प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि तत्परतेने सेवा बजावली, अशी माहिती गिरमे यांनी दिली.

## आळेफाट्यात अवैध देशी दारूविक्रीवर पोलिसांची कारवाई

**नारायणगाव (दै. संध्या)**



आळेफाटा परिसरातील निंजा चायनीज दुकानाच्या मागील परिसरात सुरू असलेल्या अवैध देशी दारू विक्रीवर पोलिसांनी छापा टाकून १२ बाटल्या जप्त केल्या. या कारवाईत सुमारे ९६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

शनिवारी दुपारी आळेफाटा चौकात सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आर .एम .हिले ,पोलीस कॉन्स्टेबल सचिन कोबल आणि व्हि .डी .दहिफळे हे गस्त घालताना पोलीस निरीक्षक जाधव यांना खबऱ्याकडून माहिती मिळाली. आळेफाटा येथील निंजा चायनीज दुकानाच्या मागे समाधान चत्रभुज गंभीरे वय 42 वर्षे राहणार चैतन्यपूर्ण ,आळेफाटा हा बेकायदा देशी दारूची विक्री करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर तातडीने कारवाई केली. गंभीरे कडून १८० मिली क्षमतेच्या संत्रा जी. एम. कंपनीच्या १२ सीलबंद देशी दारूच्या बाटल्या आढळल्या.

## शरदचंद्रच्या १६व्या शाखेचे उद्घाटन

**नारायणगाव (दै. संध्या)**



शरदचंद्र नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित राजुरी च्या 16 व्या कल्याण शाखेचा उद्घाटन सोहळा रविवार दिनांक 31/05/2026 रोजी दुपारी ठीक 12.15 वा. मा.ह.भ.प.डॉ. श्यामसुंदर महाराज सोन्नर व मा. ह.भ.प. संदीप महाराज डुंबरे यांचे करकमलांनी संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी खालील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

मा. सौ. सुलभाताई गणपत गायकवाड आमदार कल्याण विधानसभा,मा. श्री. नाना सूर्यवंशी जिल्हाध्यक्ष ,मा. श्री. निलेशजी शिंदे स्थानिक नगरसेवक ,मा. श्री. अरविंदजी पोटे माजी नगरसेवक ,

मा. श्री. सचिनजी पोटे स्थानिक नगरसेवक ,मा. श्री. राठोड साहेब व्यवस्थापक सारस्वत बँक व स्थानिक अधिकारी पदाधिकारी इतर क्षेत्रातील मान्यवर

तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. एम. डी. घंगाळे सो, उपाध्यक्ष मा. श्री. राजेंद्र विठ्ठल औटी, सचिव मा. श्री. दत्तात्रय कारभारी गंधट, खजिनदार मा. श्री. भिमाजी गणपत मालुस्कर, माजी अध्यक्ष मा. श्री. जी. के. औटी सर, मा. श्री. अनंतराव गटकळ, मा. श्री. नंदकुमार हाडवळे, मा. श्री. नरेंद्र गटकळ, व संस्थेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, सर्व संचालक मंडळ, सर्व अधिकारी, सर्व कर्मचारी, सर्व सभासद व ठेवीदार तसेच कृषी, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय व इतर क्षेत्रातील मान्यवर यांचे शाखेच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी उपस्थित राहिल्याबद्दल कल्याण शाखेच्या वतीने आपणा सर्वांचे मनापासून आभार!!!!!

संस्थेची आर्थिक स्थिती
सभासद संख्या 18500, वसूल भागभांडवल रु.18 कोटी, गुंतवणूक रु. 97 कोटी, सर्व निधी रु. 25 कोटी, ठेवी रु.315 कोटी, कर्जवाटप रु. 250 कोटी, संमिश्र व्यवसाय रु.565 कोटी, संस्थेच्या एकूण शाखा १६, नियोजित शाखा १, मुख्य कार्यालय १ असून यापुढील काळात कल्याण शाखेच्या प्रगतीसाठी सर्व संचालक मंडळ व कल्याण शाखा समिती संपूर्ण योगदान देणार असल्याचे सांगण्यात आले.

## माती परीक्षणावर भर, शाश्वत शेतीचा आधार

**नारायणगाव (दै. संध्या)**



भारतात शेतीमध्ये उत्पादन वाढीसाठी अनेक शेतकरी स्वतःच्या अनुभवाने अथवा इतरांच्या सल्ल्याने रासायनिक खतांचा वापर करतात. मात्र जमिनीतील अन्नद्रव्यांची नेमकी स्थिती माहित नसल्याने खतांचा असंतुलित वापर होतो. यामुळे उत्पादन खर्च वाढतो, जमिनीची सुपीकता कमी होते आणि पिकांच्या उत्पादनावरही विपरीत परिणाम होतो. अशा परिस्थितीत माती परीक्षणावर आधारित संतुलित खत व्यवस्थापन ही काळाची गरज असल्याचे नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राचे मृदा शास्त्रज्ञ योगेश यादव यांनी सांगितले आहे. माती परीक्षणाद्वारे जमिनीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण, सामू (पीएच), सेंद्रिय कर्ब तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांची माहिती मिळते. या अहवालाच्या आधारे पिकांच्या गरजेनुसार योग्य प्रमाणात खतांचा वापर करता येतो. त्यामुळे अनावश्यक खर्च टाळला जातो, जमिनीचे आरोग्य टिकून राहते आणि उत्पादनासह गुणवत्तेतही वाढ होते.

पिकांसाठी आवश्यक खतांचे अचूक नियोजन करता येते. खतांवरील अतिरिक्त खर्च कमी होतो.जमिनीची सुपीकता आणि उत्पादकता टिकून राहते.

केंद्र सरकारच्या मृदा आरोग्य पत्रिका योजनेच्या माध्यमातून शेतकरी आपल्या जमिनीची सुपीकता तपासू शकतात. याशिवाय नारायणगाव परिसरातील कृषी विज्ञान केंद्र अथवा स्थानिक कृषी विभागाच्या प्रयोगशाळेत माती परीक्षण करून घेण्याची सोय उपलब्ध आहे.

सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेचे निदान होते.पर्यावरणीय प्रदूषण कमी होण्यास मदत होते.

शाश्वत शेतीसाठी माती परीक्षण करून संतुलित खत व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे कृषी तज्ज्ञांनी सांगितले आहे. तसेच रासायनिक खतांसोबत सेंद्रिय खतांचा वापर वाढविण्यावरही भर देण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

## डंपरच्या धडकेत पेंटरचा मृत्यू

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

दुचाकीवरून घरी परतत असलेल्या एकास भरधाव वेगाने आलेल्या हायवा डंपरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जागीच मृत्यूमुखी पडला आहे. सदर अपघात पुणे-सोलापूर महामार्गावर मंगळवार (२ मे) रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारांस कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कवडीपाट परिसरात झाला आहे. या अपघातात मोहन जगन्नाथ माळवदकर (वय-५६, रा. गुजरवस्ती, कवडीपाट, कदमवाकवस्ती, ता. हवेली) यांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माळवदकर हे पेंटिंगचे काम करतात. काम आटोपून ते आपल्या दुचाकीवरून गुजरवस्ती येथील घराकडे निघाले होते. लोणी काळभोर बाजूकडून महामार्गावरील कवडीपाट परिसराजवळ असणारा रस्ता दुभाजक ओलांडत असताना, हडपसर बाजूकडून आलेल्या मातीने भरलेल्या हायवा डंपरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की, माळवदकर रस्त्यावर पडताच डंपरचे अवजड चाक थेट त्यांच्या डोक्यावरून गेले. यामध्ये त्यांच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला आणि त्यांचा जागीच दुर्दैवी अंत झाला. अपघातग्रस्त डंपरला फक्त पुढच्या बाजूला नंबर प्लेट लावलेली आहे, तर पाठीमागच्या बाजूला आणि इतर कुठेही कोणताही नंबरप्लेट नाही.

## कांद्याला २५ रुपये प्रतिकिलो बाजारभावाच्या मागणीसाठी मंचरजवळ रास्ता रोको

**मंचर (दै. संध्या)**



कांद्याला उत्पादन खर्चाच्या तुलनेत किमान २५ रुपये प्रतिकिलो बाजारभाव मिळावा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान कांदा उत्पादकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावी, या मागणीसाठी मंगळवारी (ता. २) पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील भोरवाडी-तांबडेमळा (ता. आंबेगाव) येथील नंदी चौकात शेतकरी व विरोधी पक्षांच्या नेत्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी राज्य व केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. कांद्याच्या घसरलेल्या बाजारभावामुळे उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली. आंदोलनात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार निलेश लंके, आमदार रोहित पवार, आमदार बाबाजी काळे, माजी आमदार अशोक पवार, आमदार अतुल बेनके तसेच आंदोलनाचे निमंत्रक व शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घातल्या होत्या.

आंदोलनापूर्वी सकाळी साडेदहा वाजता महामार्गालगत झालेल्या सभेत देवदत्त निकम, धोंडिभाऊ भोर, विशाल वाबळे, श्वेताताई ढोबळे, संजय बढेकर आणि ॲड. राजू बेंडे-पाटील यांची भाषणे झाली. कांद्याला मिळत असलेल्या अत्यल्प भावामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे वक्त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन गणेश यादव यांनी केले. त्यानंतर सकाळी साडेअकराच्या सुमारास रोहित पवार, हर्षवर्धन सपकाळ, निलेश लंके, शशिकांत शिंदे, बाबाजी काळे, अशोक पवार, अतुल बेनके यांच्यासह शेतकरी महामार्गावर उतरले आणि घोषणाबाजी करत रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे काही काळ पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी सकाळी ११.४७ वाजता आंदोलकांना ताब्यात घेऊन मंचर पोलिस ठाण्यात नेले. त्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

## नारायणगाव, येडगाव वारूळवाडी परिसरात गारपिटीसह मुसळधार वादळी पाऊस

### मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान, पाच मेंढ्यांचा मृत्यू

**नारायणगाव (दै. संध्या)**



नारायणगाव, येडगाव, वारूळवाडी परिसरात आज दुपारी गारपिटीसह मुसळधार वादळी पाऊस झाला. गारांचा तडाखा व वादळामुळे झाडावरील आंबे खाली पडल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. द्राक्षाच्या कोवळ्या वेली जमिनीवर तुटून पडल्या.शेतकऱ्यांचे डाळिंब, आंबा,टोमॅटो, शेतात झाकून ठेवलेला कांदा, उन्हाळी बाजरी सह इतर भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. कोल्हे मळा रस्त्यावर बभाळीचे झाड पडल्याने जुन्नर ओझर कडे जाणारी वाहतूक ठप्प झाली. विज वाहक तारा व विजेचे खांब पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला. आज दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास नारायणगाव, वारूळवाडी परिसरात गारपिटीसह मुसळधार वादळी पाऊस झाला. नारायणगाव,येडगाव परिसरात सुमारे पंधरा मिनिटे गारा पडल्या. त्या नंतर दोन तास मुसळधार पाऊस झाला. वादळामुळे हाताशी आलेले आंब्याची फळे खाली पडल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. द्राक्ष पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

एप्रिल छाटणीनंतर द्राक्ष वेलीवर फुटलेल्या कोवळ्या वेली व पाने तुटून पडली. गाराच्या तडाख्यामुळे द्राक्ष वेलींना जखमा झाल्या आहेत. याचा परिणाम द्राक्ष पिकावर होणार आहे. मागील वर्षी सुद्धा 25 ते 27 मे दरम्यान झालेल्या मुसळधार पावसाचा फटका द्राक्ष पिकाला बसला होता. शेतात झाकून ठेवलेला कांदा भिजून मोठे नुकसान झाले आहे. बाजार भावा अभावी अडचणीत असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्याच्या अडचणीत अजून भर पडली आहे.

टोमॅटो, धना, मेथी व इतर भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. साडे चार वाजेपर्यंत मुसळधार पाऊस कोसळत होता. पाऊस कमी झाल्यानंतर कोल्हे मळा रस्त्यावर कोसळलेले बभाळीचे झाड वाहतूक पोलीस मंगेश लोखंडे, काळूराम मासळकर, पोलीस पाटील सुशांत भुजबळ, पोलीस मित्र रामभाऊ भालशिंगे यांनी जेसीबीचा वापर करून बाजूला केले. त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. वीज पुरवठा खंडित: वादळी वाऱ्यामुळे चार ते पाच ठिकाणी विजेचे पोल उन्मळून पडले असून दहा ते पंधरा ठिकाणी तारा तुटून खाली पडल्या आहेत. वीज कंपनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जमिनीवर पडलेल्या विजवाहक तारांना स्पर्श करू नये असे आवाहन शाखा अभियंता बी. एस.बिराजदार यांनी केले आहे. वारुळवाडी येथील वेताळ बाबा मंदिराच्या जवळ तुटलेल्या विजवाहक तारांना स्पर्श झाल्याने पाच मेंढ्या मृत झाल्या आहेत. अशी माहिती वारूळवाडीचे सरपंच विनायक भुजबळ यांनी दिली.

पुणे नाशिक महामार्गालगत असलेल्या आपुलकी हॉटेल समोरील झाड पडून वाहनांवर पडून दोन मोटरीचे नुकसान झाले. येथील संदीप जाधेकर यांचे वॉशिंग सेंटरच्या पत्र्याचे शेड कोसळून मोठे नुकसान झाले.

नारायणगाव येथील कृषी विज्ञान केंद्र कृषी क्षेत्रातील विजेचे पोल, तारा तुटल्या, आंबा व चिंचेची झाडे उन्हाळून पडली. काढणी सुरू असलेल्या आंब्याच्या बागेतील केशर आंबे गळून पडल्याने आंबा बागेचे मोठे नुकसान झाले. अशी माहिती वैभव शिंदे यांनी दिली.




दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीवर राज्य शासनाचा भर

## कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून पशुपालनात भरभराट – मंत्री पंकजा मुंडे

■ मुंबई (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून राज्यातील पशुपालन व्यवसायाला भरभराटी आणावी, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज येथे केले.

'कारगिल' कंपनीने 'सिंजेंटा फाउंडेशन इंडिया' आणि 'डिजिटल ग्रीन इंडिया' यांच्या भागीदारीत महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात 'एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास उपक्रम' सुरू केला आहे. मंत्रालयात आयोजित या उपक्रमाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात श्रीमती मुंडे बोलत होत्या.



विभागाचे सचिव एन. रामास्वामी, कारगिल इंडियाचे अध्यक्ष आणि कारगिल ॲनिमल न्यूट्रिशन अँड हेल्थचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक रविंदर बलाईन, डिजिटल ग्रीन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी भसीन आणि सिंजेंटा फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम बोराडे आदी उपस्थित होते. तर अहिल्यानगर जिल्ह्यातून पशुपालक शेतकरी आणि इतर संबंधित व्यक्ती ऑनलाइन पद्धतीने कार्यक्रमास उपस्थित होते.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, शासनाचा नेहमीच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यावर आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर राहिला आहे. पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय हा आपल्या ग्रामीण जीवनमानाचा मुख्य कणा आहे. कारगिल, सिंजेंटा फाउंडेशन आणि डिजिटल ग्रीन यांचा हा संयुक्त उपक्रम आपल्या 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत' या संकल्पनेला गती देणारा ठरेल.

तंत्रज्ञान, 'फार्मरचॅट'सारखे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल मार्गदर्शन आणि थेट दारात पोहोचणारी 'पशू आरोग्य मित्र' फिरती पशुवैद्यकीय सेवा यांच्या माध्यमातून अहिल्यानगरमधील हजारो शेतकऱ्यांना थेट फायदा होईल. 'पशू सखी'च्या माध्यमातून महिलांचा वाढणारा सहभाग ग्रामीण महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देईल. हा पथदर्शी प्रकल्प संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वासही श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला आहे. अहिल्यानगरमधील राहुरी, राहता आणि श्रीरामपूर तालुक्यातील २६ गावांमधील ३ हजारहून अधिक शेतकऱ्यांपर्यंत 'पशू आरोग्य मित्र' (मोबाईल व्हेटर्नरी व्हॅन) च्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवा पोहोचवली जात आहे. याशिवाय, १२० गावांमधील ५ हजार शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सल्ला सेवा आणि क्षमता बांधणीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दोन फिरते पशुवैद्यकीय दवाखाने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या वाहनांमध्ये आधुनिक निदान साधने, औषधे आणि लसींसाठी कोल्ड-चेन सुविधा उपलब्ध असेल. यामुळे थेट शेतकऱ्यांच्या दारात वेळेवर उपचार मिळून जनावरांचा मृत्यूदर कमी होण्यास मदत होणार आहे. 'डिजिटल ग्रीन' द्वारे 'पशू सखी' आणि पॅरा-व्हेट्सना मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षित केले जाईल, जे गावोगावी जाऊन पशू पोषण, वासरांची काळजी, स्वच्छता आणि दुग्ध व्यवस्थापनाचे धडे देतील. शेतकऱ्यांसाठी फार्मरचॅट हे एआय-संचलित, आवाज आधारित प्लॅटफॉर्म सुरू करण्यात आले आहे, जे स्थानिक भाषेत जनावरांचे आजार आणि सरकारी योजनांची माहिती देईल, अशी माहिती यावेळी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

कारगिल इंडियाचे अध्यक्ष आणि कारगिल ॲनिमल न्यूट्रिशन अँड हेल्थचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक रविंदर बलाईन म्हणाले की, महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेशी पशुसंवर्धन जोडलेले आहे. कारगिल गेल्या अनेक वर्षांपासून येथील शेतकऱ्यांसोबत काम करत असून, या नव्या उपक्रमामुळे दुग्धव्यवसाय परिसंस्था अधिक मजबूत होईल. डिजिटल ग्रीन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी भसीन आणि सिंजेंटा फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम बोराडे यांनीही या भागीदारीबद्दल आनंद व्यक्त करत, हा प्रकल्प शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि हवामान-अनुकूल शेतीला चालना देण्यासाठी सहाय्यकारी ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# थोडक्यात पण महत्वाचे

## प्रतिबंधित गुटखा, पान मसालावर कारवाई

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यात अन्न व औषध प्रशासनाची प्रतिबंधित गुटखा, पानमसाल्याविरुद्ध मोहीम सुरू असून ३० व ३१ मे २०२६ या दोन दिवसात तब्बल ३२ आरोपींना अटक करण्यात आली असून, २६ आस्थापना सील व १२ लाख १६ हजार ९६५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई, कोंकण, पुणे, नाशिक व छत्रपती संभाजीनगर, अमरावती या विभागात कारवाई करण्यात आली. त्यात कोकण विभागात तब्बल १६ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून १६ लोकांना अटक करण्यात आली. बृहन्मुंबईत एका ठिकाणी कारवाई करण्यात आली व दोन जणांना अटक करण्यात आली. पुण्यात तीन ठिकाणी कारवाई करून दोन जणांना अटक, नाशिकमध्ये दोन कारवाई, दोन जणांना अटक छत्रपती संभाजीनगरमध्ये ११ कारवाई व सात जणांना अटक करण्यात आली. तसेच अमरावतीमध्ये तीन कारवाई व तीन जणांना अटक करण्यात आली.

## २३ वर्षे मुदतीचे १२०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या पाच वर्षे मुदतीच्या ८०० कोटींच्या '७.३५ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०३१' च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

## ८४ टन भेसळ साठा जप्त

मुंबई (दैनिक संध्या) : अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी मोहिमेअंतर्गत २९ ते ३१ मे २०२६ या कालावधीत राज्यातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे टाकून आंबे, बुंदी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, गुळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईसक्रिम/कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाल्याचे पदार्थ, शेंगदाणा चिक्की इ. अन्न पदार्थ तसेच भेसळ म्हणून वापरण्यात येणारे अन्न पदार्थाच्या सुमारे ९७ लाख १९ हजार ९६३ रुपये किंमतीचा ८४ हजार ३३५ किलो इतका साठा जप्त केला. अन्न सुरक्षा व मानके कायद्याअंतर्गत मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, भंडारा, जालना, बीड व नांदेड, परभणी, सोलापूर, छत्रपती सांभाजीनगर, हिंगोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम या जिल्ह्यांमध्ये कारवाई करण्यात आली.

## शिंदेंच्या उमेदवाराचा अर्ज भरताना भाजपचे ९ आमदार गायब

■ मुंबई (दै. संध्या)

सध्या राज्यात विधानपरिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वातावरण तापले आहे. येत्या १८ जूनला विधानपरिषदेसाठी मतदान होणार आहे. ठाणे विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी महायुतीचे अधिकृत उमेदवार रवींद्र फाटक यांनी नुकताच आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र, हा अर्ज दाखल करताना भाजपच्या दिग्गज नेत्यांसह तब्बल ९ आमदार गैरहजर असल्याचे पाहायला मिळाले. यामुळे आता जिल्ह्यात मोठी चर्चा रंगली आहे. भाजपची ही अंतर्गत नाराजी आगामी निवडणुकीत रवींद्र फाटक यांना घातक ठरणार का? अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागल्या आहेत. ठाणे जिल्ह्यात भाजपचे संख्याबळ जास्त असल्याने ही जागा भाजपला हवी होती, अशी जोरदार चर्चा होती. मात्र, ही जागा शिवसेनेच्या पदरात पडल्याने भाजपच्या गोटात कमालीची नाराजी असल्याचे बोलले जात आहे. रवींद्र फाटक यांनी नुकताच अर्ज दाखल केला. मात्र अर्ज भरताना भाजपचे ज्येष्ठ नेते गणेश नाईक, मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार संजय केळकर, मंदा म्हात्रे आणि नरेंद्र मेहता यांच्यासह ९ प्रमुख आमदारांनी पाठ फिरवल्याचे चित्र पाहायला मिळाले. या आमदारांच्या अनुपस्थितीमुळे महायुतीमधील अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर आल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## महाराष्ट्र लोकभवन येथे सिक्कीम व गोवा राज्य स्थापना दिवस संपन्न

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे सिक्कीम व गोवा राज्य स्थापना दिवस आज सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात विद्यापीठाच्या तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सिक्कीम व गोवा राज्यांची लोकगीते व लोकनृत्ये सादर केली. विविध राज्यांमध्ये राज्य स्थापना दिवस साजरे केल्यामुळे त्या – त्या राज्यांच्या संस्कृती, वेशभूषा, नृत्य व सांस्कृतिक परंपरेचे दर्शन होते व त्यातून राष्ट्रीय एकात्मता बळकट होते, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी यावेळी केले. सिक्कीम व गोवा राज्य परस्परांपासून शेकडो



मैल दूर असली तरीही दोन्ही राज्यांच्या विविधतेतून एकात्मता दिसून येते असे राज्यपालांनी सांगितले. सिक्कीम राज्य सुंदर गिरीरांगांनी नटलेले आहे तर गोव्याला सुंदर समुद्र किनारा लाभला आहे. दोन्ही राज्ये राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या पसंतीची राज्ये ठरली आहेत. 'एक भारत श्रेष्ठ भारत' हा एकसमानता साजरे करणारा उपक्रम नसून तो विविधता साजरा करणारा उत्सव आहे, असे राज्यपालांनी सांगितले. भारत हा केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेला प्रदेश नसून तो विविधांगी संस्कृतींनी सजलेला देश आहे असे त्यांनी सांगितले. गोवा महाराष्ट्राचा शेजारी आहे, आणि दोन्ही राज्यांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण होते. मुंबईत कामानिमित्त आलेल्या सिक्कीमच्या लोकांनी आपली संस्था निर्माण करावी व परस्परांना सहकार्य करावे असे राज्यपालांनी सांगितले. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सांस्कृतिक सादरीकरण केल्याबद्दल राज्यपालांनी त्यांना कौतुकाची थाप दिली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'मारिया पिता शे' या गोव्याच्या गीत-नृत्याला उपस्थितांनी दाद दिली. कार्यक्रमात सिक्कीमचे राज्यपाल ओम प्रकाश माथूर व गोव्याचे राज्यपाल अशोक गजपती राजू पुसपति यांचे व्हिडिओ संदेश दाखविण्यात आले, तसेच दोन्ही राज्यांचा इतिहास, वारसा, पर्यटनस्थळे दाखविणारे लघुपट दाखविण्यात आले.

## ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारा – मुख्यमंत्री

■ 'विकसित महाराष्ट्र' अंतर्गत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट

■ मुंबई (दै. संध्या)

'विकसित महाराष्ट्र अंतर्गत' एसटी महामंडळामध्ये सन 2029 पर्यंत 50 टक्के, 2035 पर्यंत 80 टक्के; तर 2047 पर्यंत एसटीचा 100 टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरीत करायचा आहे. या अनुषंगाने बसेससाठी आवश्यक असलेले चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इ-बसेससंदर्भात बैठक झाली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उपसचिव चेतन निकम आदी या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पर्यावरणपूरक ई-बसेस ज्या मार्गावर चालवायच्या आहेत, त्या मार्गाचा कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने अभ्यास करावा. पुरवठादाराकडून बस प्राप्त होताच त्या बसेसचे पुढील 7 दिवसात निरीक्षण करावे. या बसेसकरिता एक इकोसिस्टिम तयार करावी. ज्या मार्गाने खाजगी बसेस धावतात, त्या मार्गाचाही अभ्यास करून ई-बसेसचा पर्याय तयार ठेवावा. राज्य शासनाच्या विद्यमान ई-वाहन धोरणांतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत ई-बसेसचा वापर वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. या धोरणानुसार 1,500 ई-बसेसना बसच्या किमतीच्या 10 टक्के किंवा कमाल 20 लाख रुपये इतके अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात पर्यावरणपूरक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विकसित करण्याच्या उद्देशाने हे धोरण महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सध्या जीसीसी मॉडेलवर 5,150 ई-बसचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे.

## सुमन कल्याणपूर यांच्या निधनाने संगीत जगतातील देव्हारा रिकामा : राज्यपाल

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, प्रसिद्ध गायिका पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांच्या गाण्यात माधुर्य होते, तरल भाव होता व पावित्र्य होते. त्यांनी गायलेले प्रत्येक गीत थेट हृदयाला भिडणारे होते. त्यांच्या निधनाने संगीत जगतातील पवित्र देव्हारा रिकामा झाला आहे, अशीच सर्वांची भावना आहे. त्यांचे संगीत अजरामर आहे. राज्यातील जनतेच्या; तसेच संगीत रसिकांच्या वतीने मी दिवंगत सुमन कल्याणपूर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.



# ७८ हजार वृक्ष लागवड आणि इंधन बचतीची व्यापक मोहीम

## मंत्री प्रताप सरनाईक : स्वच्छ, हरित आणि सक्षम एसटी घडवण्याचा संकल्प; एसटीचा ७८ वा वर्धापन दिन

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या जनमानसाशी अतूट नाळ जुळलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण एसटी परिवाराने 'स्वच्छ एसटी, हरित एसटी आणि बचत करणारी सक्षम एसटी' घडविण्याचा निर्धार करावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त दिलेल्या शुभेच्छा संदेशात मंत्री सरनाईक म्हणाले की, 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीद अंगीकारून एसटीने गेली ७८ वर्षे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अखंड सेवा पोहोचवली आहे. डोंगर-दऱ्या, दुर्गम आदिवासी भाग, ग्रामीण क्षेत्रे, शहर आणि महानगरांना जोडणारी लालपरी ही केवळ वाहतुकीचे साधन नसून महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाची जीवनवाहिनी बनली आहे.



एसटीच्या या गौरवशाली प्रवासामागे लाखो अधिकारी, कर्मचारी, चालक-वाहक, निवृत्त सेवक आणि प्रवाशांचे योगदान असल्याचे नमूद करत त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. अनेक संकटांच्या काळातही एसटी कर्मचाऱ्यांनी निष्ठेने आणि समर्पणाने सेवा देत समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडले असून अशा प्रत्येक कर्मचाऱ्याला आज सलाम करण्याची भावना असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत एसटी परिवाराने यावर्षी '७८ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प' केल्याची माहिती देताना मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यातील प्रत्येक आगार, बसस्थानक आणि कर्मचारी या मोहिमेत सहभागी होणार आहे. पर्यावरण रक्षण ही केवळ शासनाची नव्हे तर समाजाची सामूहिक जबाबदारी असून 'एक वृक्ष – एक जीवन' हा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम एसटी करणार आहे. यासोबतच "स्वच्छ एसटी – सुंदर एसटी" ही संकल्पना अधिक व्यापकपणे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील सर्व बसस्थानके, बसस्थानक परिसर, एसटी बसेस तसेच चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांची नियमित स्वच्छता आणि टापटीपपणा राखण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुखकर प्रवासाचा अनुभव देणे ही एसटीची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

महामंडळाच्या आर्थिक शिस्तीसाठी इंधन बचतीचे महत्त्व अधोरेखित करत मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रत्येक आगाराने दररोज किमान पाच लिटर डिझेल बचत करण्याचा संकल्प केला आहे. छोट्या-छोट्या बचतीतून मोठी आर्थिक उभारणी शक्य होते. इंधन बचतीमुळे महामंडळाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्याबरोबरच प्रदूषण नियंत्रणालाही मोठा हातभार लागणार आहे. त्यामुळे सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करून ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी केले. एसटी ही महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे नमूद करत त्यांनी आगामी काळात आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल सुविधा, आर्थिक शिस्त, हरित उपक्रम, स्वच्छता आणि प्रवासी-केंद्रित सेवा यांच्या माध्यमातून एसटीला नव्या उंचीवर नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याची गरज व्यक्त केली. ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण एसटी परिवाराने स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि उत्कृष्ट प्रवासी सेवा यांचा संकल्प करून महाराष्ट्राच्या विकासात अधिक प्रभावी योगदान द्यावे, असे आवाहन करत मंत्री प्रताप सरनाईक यांनी अधिकारी, कर्मचारी, चालक-वाहक, निवृत्त सेवक तसेच राज्यातील सर्व प्रवाशांना एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. 'चला, स्वच्छ एसटी, हरित एसटी आणि सक्षम एसटी घडविण्याचा निर्धार करूया,' असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## 'दिलखुलास' कार्यक्रमात डॉ. विक्रम आरळेकर यांची ४ आणि ५ जूनला विशेष मुलाखत

■ मुंबई (दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त विशेष भाग प्रसारित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे कोल्हापूर जिल्हा सल्लागार डॉ. विक्रम आरळेकर यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार असून, तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे आरोग्यविषयक, सामाजिक आणि आर्थिक दुष्परिणाम याविषयी ते सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत ४ आणि ५ जून २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर, तसेच न्यूज ऑन AIR या मोबाईल ॲपवर प्रसारित होणार आहे. ही मुलाखत कोल्हापूर विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक वृषाली पाटील यांनी घेतली आहे.



या मुलाखतीच्या माध्यमातून तंबाखूच्या वाढत्या व्यसनाची कारणे, तरुणांमध्ये वाढणारे गुटखा, पानमसाला, सिगारेट, ई-सिगारेट आणि व्हेपिंगचे आकर्षण तसेच तंबाखू सेवनामुळे उद्भवणारे कर्करोग, हृदयरोग आणि फुफ्फुसांच्या विकारांसारख्या गंभीर आजारांबाबत माहिती दिली जाणार आहे. यासोबतच राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृती मोहिमा आणि शासनाच्या उपाययोजनांचाही आढावा घेण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात तंबाखूमुक्ती समुपदेशन केंद्रांची भूमिका, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विशेष उपक्रम, तंबाखू विक्रीसंदर्भातील कायदेशीर तरतुदी, 'पॅसिव्ह स्मोकिंग'चे धोके, तसेच पालक, शिक्षक आणि समाजाची जबाबदारी याविषयी सखोल चर्चा करण्यात येणार आहे. याबरोबरच तंबाखूचे व्यसन सोडू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी उपलब्ध असलेल्या समुपदेशन सेवा आणि व्यसनमुक्तीच्या विविध उपायांबाबतही महत्त्वपूर्ण माहिती या मुलाखतीच्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

# अजितदादांच्या निधनाने हवेली तालुक्याचा विकास खुंटला

## पाच महिन्यात एकही मोठे काम पुर्व हवेलीत झाले नाही : पाणी प्रश्न व कचरा प्रश्न गंभीर



**लोणी काळभोर (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी बारामतीजवळ विमान अपघातात निधन झाले. आणि हवेली तालुक्यावर शोककळा पसरली. हवेली तालुका हा अजित पवार यांच्याशी ३०-३५ वर्षांपासून जोडलेला होता. त्यांच्या अचानक जाण्याने तालुका "पोरका" तर झालाच परंतु विकासाची चाके चिखलात गुंतल्यासारखी जाग्यावरच थांबली. गेल्या पाच महिन्यात एकही मोठे काम पुर्व हवेलीत झाले नाही. उलट लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथील पाणी प्रश्न व कचरा प्रश्न गंभीर बनला असुन यामुळे नागरिकांना खुपच त्रास सहन करावा लागत आहे.

उपमुख्यमंत्री अजितदादा यांचे हवेली तालुक्यावर विशेष प्रेम होते. हवेली तालुका हा पवार कुटुंबांना मानणारा तालुका असुन पुर्वी पासून या तालुक्यात जेष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या जवळचे अनेक सहकारी लोणी काळभोर ,उरुळी कांचन व इतर गावात आहेत. तसेच कार्यकर्ते अजितदादा यांचे पण आहेत. तळागाळातील कार्यकर्ते जमवुन त्यांना अनेक महत्वाच्या पदावर अजितदादा यांनी बसविले आहेत. हवेली तालुक्यातील प्रत्येक गावावर त्यांचे विशेष प्रेम होते. मग ते गाव मोठे असो वा छोटे. प्रत्येक गावात अजित दादांना मानणारा मोठा जनसमुदाय होता. अजित दादा पुणे - सोलापूर महामार्गावरुन जाताना पुर्व हवेलीतील एका तरी गावात थांबून सर्व चौकशी करत असत. आणि कार्यकर्त्यांना काही अडचण असल्यास त्याचे निवारण अजित दादा करत असत. त्यामुळे अजित दादांचे प्रत्येक गावात कार्यकर्ते होते. हवेली तालुक्याला विकासासाठी अजित दादांनी भरभरून निधी दिला. मग तो लोणी काळभोर येथील जलजीवन योजना, पाणी शुध्दीकरण असो उरुळी कांचन येथील विविध कामासाठी विकास निधी, महावितरणसाठी निधी , विविध ग्रामपंचायतींना निधी दिला. अशा विविध योजनांच्यासाठी हवेली तालुक्याला मदत केली आहे. हवेली तालुक्यातील नेते अजित दादांकडे हक्काने विकास कामे घेऊन जात असत. मग ती विकास कामे करताना अजित दादांनी कधीही गावांना नाराज केले नाही. हवेली तालुक्यातील अनेक प्रश्न दादांनी सोडवण्यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अस्मितेचा प्रश्न असलेला थेऊर येथील श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखाना चालू करण्यासाठी प्रयत्न केला असुन चालू होण्याआधी अजित दादांचे जाणे हवेली तालुक्याला धक्का देणारे ठरले आहे. पुणे येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका घेऊन त्यावरील प्रशासक जाऊन हवेलीतील नेते निवडून आले. हे मोठे यश अजित दादांमुळेच मिळाले आहे. सुरुवातीला मेट्रो फक्त हडपसर पर्यंतच होती. नंतर दादांनी लोणी काळभोर पर्यंत तिचा मार्ग वाढवला व आता ती आता उरुळी कांचन पर्यंत नेण्यासाठीची योजना अजित दादांनी तयार केल्याची माहिती नागरिकांनी दिली. सर्वात मोठा प्रश्न पुणे - सोलापूर महामार्गावरील वाहतूक कोंडीचा दादांच्या लक्षात आणुन देताच

भैरोबा नाला ते यवत हा सहा-लेन उड्डाणपूल प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पायाभूत समितीने मंजूर केला असून, उपमुख्यमंत्री अजित दादांनी विधानसभेत तशी घोषणा केली होती. यात मेट्रो मार्गाचीही तरतूद आहे.

हा दुमजली उड्डाणपूल भैरोबा नाल्यापासून (हडपसरजवळ) सुरू होऊन यवतपर्यंत जाईल. त्यामुळे हडपसर, लोणी काळभोर, उरुळी कांचन भागातील वाहतूक कोंडी दूर होऊन पुणे-सोलापूर प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणावर वाचणार आहे. अजित दादांनी हवेली तालुक्यातील अनेक नेते मंडळींची राज्याच्या व जिल्हाच्या विविध संस्थेवर निवड करुन मोठे केले. दादांच्या अचानक जाण्याने हवेली तालुका पोरका झाला असुन विकास कामे ठप्प झाली आहेत.

कचऱ्याची सर्वात मोठी समस्या असुन लोणी काळभोर व कदमवाकवस्ती या गावानां कचरा टाकण्यासाठी जागाच नाही. पुर्वी पासुन एमआयटी कॉलेज जवळ कचरा टाकला जायचा परंतु मध्यंतरी कचऱ्याला आग लागल्याने हायस्कूल व कॉलेजच्या विद्यार्थ्यांना खुपच त्रास झाला. त्यामुळे एमआयटी कॉलेजने रस्ताच अडवला. त्यामुळे कचऱ्याची समस्या या दोन्ही गावात भयंकर झाली आहे. पाणी टंचाई तर पुर्व हवेलीत १००% जाणवते. याला कारण अनेक गावातील सरपंच व त्यांच्या टिमने अभ्यास पुर्ण नियोजन केले नसल्याचे दिसून येत आहे. लोणी काळभोर सारख्या मोठ्या गावात तर पाणीटंचाई तीव्र झाली असुन काही वॉर्डात तर टँकरने पाणी एक युवा नेता पुरवत आहे. दोन दिवसातून एकदा पाणी येत असुन. नवीन मुठा कालवा येथून गेला असुन कालव्यात पाणी भरभरून वाहते परंतु कालवा उशाला व कोरड घशाला अशी अवस्था लोणी करांची झाली आहे. गावोगावचे रस्ते ,पुल याची अवस्था बेकार झाली आहे. गावातील अनेक प्रश्न हवेलीत तसेच पडुन आहे. जलजीवन योजना मंजुरी साठी अजित दादांकडे सारखे जाणारे पुढारी आज गप्प आहेत. कारण जलजीवन योजनेचा बोऱ्या कधीच वाजला आहे. ग्रामपंचायतीमध्ये पुढाऱ्यांचा वचक राहिला नाही. बऱ्याच ग्रामपंचायतीची मुदत संपली असुन प्रशासक नेमले आहेत. त्यामुळे पुढारी तिकडे फिरकत देखील नाही. ज्यांना परत ग्रामपंचायतीला उभे राहायचे आहे. त्यांनी बरखास्त ग्रामपंचायत मध्ये जाऊन नागरिकांच्या अडचणी सोडवत राहणे गरजेचे आहे. अजित दादा होते तेव्हा सत्ता असो वा नसो अजित दादा सतत नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करायचे परंतु आत्ताचे पुढारी मुदत संपली की वॉर्ड व ग्रामपंचायत यांच्या कडे बघत सुद्धा नाही मग कसे परत निवडून येणार अशी चर्चा हवेलीत चालू आहे. हवेली तालुक्याला सर्वात मोठा आधार हा अजित दादांचा होता. परंतु त्यांच्या जाण्याने हवेली पोरकी झाली असुन आपले प्रश्न कुणाकडे मांडायचे असा प्रश्न ग्रामस्थ व पुढाऱ्यांना पडला आहे. आत्ताच्या परिस्थितीत कुणाचीही ताकद नाही की डायरेक्ट नेत्यांकडे जाऊन गावातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करायची. या सर्व गोष्टींचा विचार केला तर अजितदादांच्या निधनाने हवेली तालुक्याचा विकास खुंटला असुन कधी न भरुन येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### तब्बल 82 साक्षीदारांपैकी 13 जणांची साक्ष पूर्ण; पुढे काय उघड होणार?



पुणे (दैनिक संध्या) : नसरापूर येथे चिमुकलीवर अत्याचार करून तिचा खून केल्याप्रकरणी येथील न्यायालयात सुरू असलेल्या खटल्यात आतापर्यंत एकूण १३ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली असून, सोमवारी झालेल्या सुनावणीत मुलीच्या आजीची साक्ष घेण्यात आली. या प्रकरणात आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५, रा. भोर) याच्याविरोधात राजगड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरू आहे. या खटल्यात एकूण ८२ साक्षीदारांची यादी सरकार पक्षातर्फे सादर करण्यात आली आहे. त्यापैकी पहिल्या १३ साक्षीदारांची साक्ष विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी न्यायालयासमोर नोंदविली. बचाव पक्षातर्फे ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी साक्षीदारांची उलटतपासणी घेतली. साक्षीदारांमध्ये मुलीची आई, वडील, तिच्या मृत्यूच्या कारणांचा पंचनामा करणारे पंच आणि आरोपीला मुलीसमवेत पाहणाऱ्यांचा समावेश आहे.

### उच्च उत्पन्न गटातील 10हजार पेक्षा अधिक लाभार्थ्यांना नोटीसा

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकानांमार्फत मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्या उच्च उत्पन्न गटातील लाभार्थ्यांवर प्रशासनाने कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. खेड तालुक्यातील १९४ स्वस्त धान्य दुकानांमधून लाभ घेणाऱ्या सुमारे १० हजार ८४७ लाभार्थ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या लाभार्थ्यांना ७ मेपासून धान्य वितरण बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आली असून, त्यांनी आपला खुलासा सादर करावा, असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. अशी माहिती खेडचे तहसीलदार प्रशांत बेंडसे यांनी दिली आहे. शासनाची मोफत धान्य वितरण व्यवस्था हि गोर गरीब ,गरजू कुटुंबासाठी आधार देणारी ठरली असून मात्र मोफत धान्याचा लाभ गरीब कुटुंबाबरोबर आर्थिक सक्षम असणारे सदन कुटुंब घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. तालुक्यातील आय. टी.आर भरणारे,स्वतःच्या नावे समकक्ष व्यावसायिक फर्म असणारे,कर भरणारे असे १०हजार ८४७ उच्च उत्पन्न लाभार्थ्यांची नावे जिल्हा पातळीवरून शोधमोहीमेतून शोधून त्यांना नोटीसा बजाविण्यात आल्या असून,२१५ जणांनी त्यावर खुलासे सादर केले असल्याची माहिती पुरवठा निरीक्षक अधिकारी एम. ए.कुंभार यांनी दिली. खेड तालुक्यात १९४ स्वस्त धान्य दुकानातून ६० हजार २२ शिधाधारक संख्या असून त्यामध्ये केसरी कार्ड ६०७५१, अंतोदय ३२७१,तर शुभ्र कार्ड धारकांची संख्या १०२५ इतकी असून केसरी कार्ड धारकांना मानसी दोन किलो तांदूळ व तीन किलो गहू तर अंतोदय लाभार्थीना २२किलो गहू,१३ किलो तांदूळ,देण्यात येतो. शासनाच्या निकषांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ केवळ पात्र व गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचावा, यासाठी अपात्र लाभार्थ्यांची छाननी सुरू असून संबंधितांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांचे धान्य वितरण बंद करण्यात येणार आहे.

### गुन्हेगारी कमी झाल्याचा दावा असेल तर पुणेकरांच्या मनात भीती का?

पुणे (दैनिक संध्या) : गुन्हे कमी झाल्याचे कागदोपत्री दिसत असले, तरी नागरिकांना ते वास्तव वाटत नाही. 'आकडेवारी आणि जनतेचा अनुभव यांच्यात एवढी तफावत का?' असा थेट सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला आहे. आकडेवारीत घट दिसत असताना नागरिकांच्या मनातील भीती मात्र वाढत असल्याचे नमूद करत सुळे यांनी पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांना सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत चिंता व्यक्त करत खासदार सुप्रिया सुळे यांनी पुणे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी शहरातील गुन्हेगारी कमी झाल्याचा दावा करणारे पत्र सुळे यांना पाठविले होते. या पत्राला सुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पुणे शहरातील गुन्हेगारी कमी झाल्याचा दावा पोलिस आयुक्तांकडून केला जात असला, तरी प्रत्यक्षात पुणेकरांच्या सुरक्षेला लागलेली 'गुन्हेगारीची कीड' अधिकच फोफावत असल्याचा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. सुळे यांनी आपल्या पत्रात महाराष्ट्र पोलिस दलाबद्दल आदर व्यक्त केला असून, पोलिसांच्या कामगिरीवर टीका करण्याचा हेतू नसल्याचे स्पष्ट केले. मात्र, पुणे शहरात सातत्याने घडणाऱ्या गंभीर घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढल्याचे त्यांनी म्हटले आहे. गुन्हेगारीच्या घटनांची संख्या हा एक निकष असला, तरी त्यातील क्रौर्य, उघडपणे होणारे हल्ले आणि वाढती दहशत याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे त्यांनी नमूद केले. म्हाळुंगे येथील बालकाच्या हत्येपासून ते हडपसरमध्ये सापडलेल्या बॉम्बसदृश वस्तूपर्यंत अनेक घटनांचा उल्लेख करत सुळे यांनी शहरातील परिस्थिती चिंताजनक असल्याचे म्हटले आहे. नांदे गावातील भरदिवसा झालेली कोयत्यांची दहशत, दिवे घाटातील टोळक्यांचा हैदोस, रिक्षाचालकावर झालेला प्राणघातक हल्ला, अल्पवयीन मुलींवरील अत्याचार आणि दिवसाढवळ्या झालेले खून या घटनांनी पुणेकरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्र देशात टॉपर

**पुणे (दै. संध्या)**



छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत दि. २९ मे रोजी देशात आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक १५ हजार घरांवर प्रकल्प बसविण्यात आले असून त्यापैकी ४,७०० घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी महाराष्ट्राचे अभिनंदन केले असून राज्याने ६ लाखापेक्षा अधिक घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या निवडक राज्यांच्या गटात प्रवेश केल्याबद्दलही कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीने वेग घेतला आहे. मे महिन्यात योजनेसाठी सादर अर्जांमध्ये देशात प्रथम क्रमांक, प्रकल्प बसविलेल्या एकूण घरांमध्ये दुसरा क्रमांक, प्रकल्पांच्या तपासणीमध्ये पहिला क्रमांक आणि पुरवठादारांच्या नोंदणीमध्ये दुसरा क्रमांक अशा रितीने या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या पाच टॉपर राज्यांमध्ये समाविष्ट झाला आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात महावितरणमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. या यशाबद्दल राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती वीज ग्राहकांना घराच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी थेट अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. या योजनेच्या अंमलबजावणीत वीज ग्राहकांकडून अर्जांची स्वीकृती, प्रत्यक्ष प्रकल्प बसविणे आणि त्याची तपासणी करून तो सुरू करणे हे तीन महत्त्वाचे टप्पे असतात. मे महिन्यात या योजनेसाठी देशभर विशेष अभियान चालविण्यात आले होते त्यामध्ये महाराष्ट्र राज्य टॉपर ठरले आहे.

योजनेसाठी मे महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये ४ लाख ४९ हजार अर्जांसह महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. गुजरात (३ लाख), उत्तर प्रदेश (१ लाख), राजस्थान (४४ हजार) व केरळ (३५ हजार) या राज्यांचा महाराष्ट्रानंतर क्रमांक लागतो.

छतावर सौरऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य ५४ हजार प्रकल्पांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. याबाबतीत उत्तर प्रदेश (६४ हजार), गुजरात (३५ हजार), राजस्थान (२६ हजार) व केरळ (२० हजार) ही अन्य राज्ये टॉप पाच राज्यांमध्ये आहेत. छतावर बसविलेले सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प तपासण्याच्या बाबतीही महाराष्ट्र राज्य ६९ हजार प्रकल्पांसह पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (६४ हजार), गुजरात (४२ हजार), राजस्थान (२७ हजार) व केरळ (१८ हजार) ही राज्ये महाराष्ट्रानंतर टॉप पाचमध्ये समाविष्ट आहेत. छतावर सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्याचे काम नोंदणीकृत कंत्राटदारांमार्फत केले जाते. ग्राहकाला आपल्या पसंतीप्रमाणे कंत्राटदार निवडता येतो. कंत्राटदारांच्या नोंदणीमध्ये ४१३ कंत्राटदारांसह महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (७७९), गुजरात (२१०), आसाम (१८१) व राजस्थान (१७७) ही सर्वोच्च कामगिरीच्या पाचपैकी अन्य राज्ये आहेत.

## हर घर सावरकर समिती नोंदणीकृत नाही

**पुणे (दै. संध्या)**

"हर घर सावरकर' हे अभियान आपण चालवत असून, त्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. मात्र ही समिती नोंदणीकृत नाही. या समितीच्या माध्यमातून स्वा. सावरकरांच्या पुस्तकांची विक्री व अन्य उपक्रम चालविले जातात. परंतु, याचे अधिकृत लेखापरीक्षण केले जात नाही, खाजगी ताळेबंद ठेवला जातो, अशी माहिती फिर्यादी सात्यकी सावरकर यांनी न्यायालयात दिली. मात्र, फिर्यादीच्या वकिलांनी यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांवर आक्षेप घेत, अशा स्वरूपाचे प्रश्न खटल्याशी निगडित नसल्यामुळे विचारता येणार नाहीत, असे सांगून हरकत नोंदविली. स्वा. सावरकर यांची बदनामी केल्याप्रकरणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात सावरकर यांचे पणतू सात्यकी सावरकर यांनी मानहानीचा दावा दाखल केला आहे. विशेष एमपी-एमएलए न्यायालयात या दाव्याची सुनावणी सुरू असून, फिर्यादी यांचा राहुल गांधी यांचे वकील ॲड. मिलिंद दत्तात्रय पवार यांनी सविस्तर उलटतपास घेतला. सावरकर यांच्यावतीने ॲड. संग्राम कोल्हाटकर बाजू मांडत आहेत. खटल्याच्या खर्चासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सात्यकी सावरकर यांनी हा खटला स्वतःच्या खर्चाने चालवत असल्याचे सांगितले.

तसेच “हर घर सावरकर” या समितीच्या माध्यमातून सावरकरांची पुस्तके, साहित्य, टी-शर्ट्स, आकाशकंदील आदी वस्तूंची विक्री केली जात असून, देणगीदारांना आवश्यक तेवढाच हिशोब दिला जात असल्याचे त्यांनी न्यायालयात सांगितले.

## सभापती अमित झेंडे यांच्या पाठपुराव्याला यश

### मार्चमध्ये अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई १५ दिवसांत शेतकऱ्यांना मिळणार

**पुरंदर (दै. संध्या)**



पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांना मार्च २०२६ मध्ये झालेल्या गारपीट,अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यांमुळे नुकसान झालेल्या पिकांची भरपाई पुढील १५ दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती पुरंदर पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे यांनी दिली.

मार्च महिन्यात कोथळे, पिंपरी, नायगाव, पिसर्वे, मावडी सुपे, पांडेश्वर, राजुरी, रिसे, पिसे, माळशिरस, जवळार्जुन आणि रानमळा या गावांतील शेतकऱ्यांच्या बागायती, फळबागा तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. हातातोंडाशी आलेली पिके नष्ट झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. या नुकसानीबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर आता तालुक्यातील एकूण १४६५ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मंजूर झाली असून,त्याची रक्कम ७५०२८०५ रुपये आहे.

येत्या १५ दिवसांच्या आत संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात भरपाईची रक्कम जमा होणार आहे,यासाठी प्रशासनाचे सहकार्य लाभले असे सभापती अमित झेंडे यांनी सांगितले.

नुकसान भरपाईची रक्कम कधी मिळणार याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले होते.आता ही रक्कम मिळाल्यानंतर आगामी खरीप पेरणीसाठी आर्थिक मदत होणार असून, शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल

.शासनाने ही प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण करून लवकरात लवकर रक्कम खात्यात जमा करावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## कंपनीचा कामगारच निघाला चोरटा

### सहा जणांची टोळी जेरबंद : महाळुंगे पोलिसांची यशस्वी कामगिरी

**चाकण (दै. संध्या)**




कंपनीचा कामगारच चोरटा निघाल्याची धक्कादायक बाब समोर आली असून या चोरट्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने 'टाईने रिबेल' बीअर कंपनीतून ३६ लाख रुपये किमतीचे १० बीअर स्टोरेज टँक चोरले. कोणताही ठोस पुरावा नसताना उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस पथकाने सहा जणांच्या टोळीला रविवारी तांत्रिक पुराव्यांच्या मदतीने जेरबंद केले. प्रसाद विनोद राजळे (वय २९, रा. पिरंगुट, ता. मुळशी), चंदन अर्जुन सिंग (वय ३८, रा. कुदळवाडी, चिखली), अली अहमद चौधरी (वय ३२, रा. कुदळवाडी, चिखली), फिरोज असगर अली खान (वय ३८, रा. मोशी), किसनकुमार सुभाषचंद्र गुप्ता (वय २४, रा. कुदळवाडी, चिखली) व नियाज मोहम्मद इसराईल (वय ५१, रा. मुंब्रा, ठाणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. अधिक माहिती अशी की, महाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. २० फेब्रुवारी २०२६ ते ३० मार्च, २०२६ या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी कंपनीतील ३६ लाख रुपये किमतीच्या १० मोठ्या बीअर स्टोरेज टाक्या लंपास केल्या होत्या. पोलीस उपाआयुक्त श्वेता खेडकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पोलीस पथकाला याबाबत योग्य त्या सूचना केल्या होत्या. पोलिसांनी सुमारे ३० ते ३५ कंपन्यांचे ६०० जीबीपेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषणातून संशयीत क्रेन व ट्रक निश्चित झाले. कंपनीचा विश्वासू कामगार प्रसाद राजळे याचे नाव निष्पन्न होताच त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. या गुन्ह्यात पोलिसांनी मुख्य सूत्रधारासह एकूण ६ जणांना अटक केली. चोरीला गेलेले सर्व १० बीअर स्टोरेज टँक कुदळवाडी, चिखली, मुंब्रा ठाणे येथून जप्त केले.

